११६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०९८



# चीन मधील शिक्षण

REFBK-0014384

लेखक · के. ई. प्रीस्टले

अनुवादक · स. गं. मालशे

विभाग
७५६२७
२०/३/७९.
२०८८

शिक्षणशास्त्र

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
संमृद्धी योजना
* १९७० *

# चीनमधील शिक्षण

लेखक :

के. ई. प्रीस्टले

अनुवादक :

प्रा. स. गं. मालशे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४.३८
शाखा (स्थळ प्रत)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७५६२७ वि: शिक्षण
2001 नोंद दि 2013.07

REFBK-0014384

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लिमिटेड
३, राउंड बिल्डिग, मुंबई २

‘एज्युकेशन इन चायना’
या पुस्तकाचा अनुवाद

✦ ✦ ✦

पहिली आवृत्ति : १९६५

✦ ✦ ✦

मूल्य : रु. १-००

✦ ✦ ✦

प्रकाशक : **अ. ल. गाडगीळ**
वोरा अॅण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.,
३, राउंड बिल्डिंग, मुंबई २.

✦ ✦ ✦

मुद्रक : **रा. ब. कुलकर्णी**
मनोजय मुद्रणालय,
१३८-१३९ नारायण पेठ,
पुणें २.

## अनुक्रमणिका


पृष्ठ

प्रस्तावना ५

### भाग पहिला : शिक्षणविषयक सिद्धांत, कल्पना आणि कार्यपद्धति यांतील क्रांति

१. पाश्चात्य कल्पनांचा त्याग ११
२. शिक्षणामागील पक्षप्रेरणा १५
३. मतप्रणालीचें शिक्षण १७
४. उत्पादक श्रम २०
५. स्थानिक पक्षसत्ता आणि शिक्षणप्रसार २२

### भाग दुसरा : शिक्षणक्षेत्रांतील विविध पातळ्यांवरील महत्त्वाच्या घडामोडी

६. प्राथमिक शाळा २५
७. शिक्षकांची समस्या २५
८. माध्यमिक शाळा ३०
९. अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या शाळा ३०

१०. शिक्षणाचा दर्जा ३४
११. उच्च शिक्षण ३७
१२. विद्यापीठविषयक सरकारी धोरण ३८
१३. नव्या संपूर्ण कम्युनिस्ट मानवाची जडणघडण ४०
१४. उच्च शिक्षणाची लोकप्रियता वाढविण्यामागील हेतु ४३
१५. क्रांतीच्या मार्गावर ? ४६
१६. प्रौढांसाठीं फावल्या वेळचें शिक्षण ४७
१७. परदेशस्थ चिनी विद्यार्थी ५१
१८. साक्षरताप्रसार आणि ध्वनिदर्शक (Phonetic) वर्णमाला ५५

भाग तिसरा : **पुढील वाटचाल**

१९. अभिप्राय ५९

□□□

# प्रस्तावना

चिनी शिक्षणपद्धतीची गोष्ट अशी आहे कीं, पाश्चात्य वाचकाला तिची पुरेशी कल्पना आणून देण्याइतपत तिचें चित्र रेखाटायचें म्हटलें, तरी कांहीं खास अडचणी, दत्त म्हणून पुढें उभ्या राहतात; मग तें चित्र पाश्चात्य वाचकाला मनोवेधक वाटेल, असें रंगविण्याची तर गोष्टच सोडा ! यांतली पहिली अडचण म्हणजे कम्युनिस्ट पद्धतीची शब्दबंबाळ भाषाशैली. पुनरुक्तीचें तेंच तेंच दळण दळून कान किटवणारी ही ठोकळेबाज शैली अगदीं कंटाळवाणी असते ! सर्व प्रकारचें कच्चें लेखन, मग तें मूळ चिनी भाषेंतलें असो, किंवा भाषांतरित असो याच टांकसाळींतून बाहेर पडलेलें असतें. त्याचें स्वरूप नेहमींच सरकारी शिक्क्याच्या परिपत्रकाचें असतें. स्वतंत्र देशांत गंभीर विषयावरील वृत्तपत्रीय टीका, उत्स्फूर्त शेऱ्याताशेऱ्यांनीं किंवा वैयक्तिक बोचकाऱ्यांनीं पुष्कळदां जितकी मनोरंजक तितकीच उद्‌बोधक वाटते. पण तसा जिवंतपणा येथील लेखनांत कधींच आढळायचा नाहीं. सरकारी प्रेरणेनें निघालेलें चटकदार शैक्षणिक परिपत्रक ही चीज येथें शोधूनहि सांपडणें कठिण ! शिवाय कम्युनिस्ट शिक्षणपद्धतीचें सत्यदर्शन घडविणारें चित्र रेखाटण्याच्या मार्गावर खोट्या किंवा अस्पष्ट चित्रणाकडे नेणारे असंख्य चकवे आहेत. याचें मूलभूत कारण असें आहे कीं, चिनी शिक्षणपद्धती स्पर्श करूं पाहते त्या गोष्टी आणि लोकशाही राष्ट्रांतील शिक्षणपद्धती स्पर्श करूं पाहतात, त्या गोष्टी यांत महदंतर आहे. या बाबतींत मिळणाऱ्या साधनसामग्रीचें न्याय्य मूल्यमापन करणें आणि तिचें शास्त्रीय दृष्टीनें पृथक्करण करणें आणि नंतर त्यांची योग्य सांगड घालणें, हें काम कांहीं साधें नाहीं. चीनमध्यें प्रत्यक्ष प्रवास करून येणें, हाहि या अडचणींवरचा तोडगा नाहीं. हेतुपूर्वक केलेली छपवाछपवी डोळ्यांना थोडीच दिसणार ! तसेंच पाहायची परवानगी मिळालेल्या प्रत्येक गोष्टीचा काळजीपूर्वक तयार केलेला अहवालच कानावर पडेल अशी व्यवस्था केलेली असते. वृत्तपत्रांना पुरविलेलीं सरकारी निवेदनें हाच चर्चेचा प्रारंभबिंदु व्हावा, ही गोष्ट अटळ आहे.

दुसरें असें कीं, चिनी शिक्षणपद्धतीनें रूढ चाकोरी इतकी झुगारून दिली आहे कीं, तेंच तिचें खास वैशिष्ट्य ठरावें. अमेरिकन संघटनेच्या धर्तीवरची मूळ परंपरा, त्यांत सोव्हिएट रशियाकडून मिळालेली स्फूर्ति, तसेंच राजकीय व सामाजिक क्षेत्रांत घडून आलेली क्रांति व या सर्वांना भडकावून देणारें अलिकडचें आर्थिक वारें या एकंदर गोष्टींचा मिलाफ होऊन एक प्रकारची विचित्र शैक्षणिक यंत्रणा चीनमध्यें उभारली गेली आहे. परिणामीं सद्यःकालीन चिनी शिक्षणपद्धतीचीं कांहीं अंगें सकृत्‌दर्शनीं वेगळेपणाचीं वाटण्याजोगीं आहेत. सुटा सुटा विचार केला तर सध्यां सर्व शैक्षणिक पातळयांवर शारीरिक कष्टांना जें जादा महत्त्व दिलें जात आहे, तें अनाकलनीय वाटेल. चिनी शिक्षणपद्धतीचीं अंगोपांगें कांहीं वेगळीं वाटत असतील तर त्याचें कारण असें कीं, चीनच्या विशिष्ट इतिहासाचें त्यांत स्पष्ट प्रतिबिंब पडलेलें आहे. चिनी शिक्षणपद्धति हें चीननें केलेल्या झगडयाचें प्रतीक आहे. चीनची अर्थव्यवस्था आणि चीनचा इतिहास यांतच ही शिक्षणपद्धति समजावून घेण्याची गुरुकिल्ली आहे.

एक आधुनिक राष्ट्र बनण्याची चीनची जी धडपड चालू आहे, तिच्यामागें प्रयत्नांचें, क्रांतीचें, पूर्ततेचें आणि चुकांचें अर्धशतक खडें आहे. प्राचीन पूर्वपरंपरेचा वारसा असलेले, निसर्गतःच उच्च प्रकारच्या बुद्धिमत्तेचें वरदान लाभलेले, संख्येनें सातशें दशलक्षांहून अधिक असलेले आणि खंडप्राय प्रदेशांत इतस्ततः विखुरलेले हे लोक, त्यांना हांकून देण्यासाठीं होत असलेल्या सर्व उपऱ्या प्रयत्नांविरुद्ध बद्धपरिकर झालेले आहेत. त्यांची खात्री पटली पाहिजे आणि ती तशी पुढेंहि पटत राहिली पाहिजे. प्रागतिक नेमस्त कार्यपद्धति आणि क्रांतिकारक जहाल कार्यपद्धति यांमध्यें दोलायमान स्थितींत सन् यत् सेन राहिला. सोव्हिएट रशियाच्या साहाय्यासाठीं त्यानें हात पुढें केला, तेव्हां त्याच्या हातीं जी गुरुकिल्ली ठेवण्यांत आली, तिची जादू किती प्रभावी आहे, याचा थांगपत्ता न लागतांच तो अपयशी व निराश अवस्थेंत वारला.

औद्योगिक आणि कृषिविषयक अर्थकारणाच्या आधुनिकीकरणाची जी क्रांति कम्युनिस्ट शासनाखालीं सध्यां चीनची प्रगति साधीत आहे, ती क्रांति मूलतः १९११ सालीं चेतविल्या गेलेल्या महत्त्वाकांक्षेचाच आविष्कार आहे. क्रांतीची गति आणि कार्यपद्धति, अर्थातच, बदलली आहे. पण पूर्वीं कल्पना

नव्हती एवढ्या प्रचंड प्रमाणावर राष्ट्रीय जीवनाची पुनर्निर्मिति होत आहे. लंडन येथील ब्रिटिश म्युझियममध्यें ठाण मांडून मार्क्सनें जी संहिता तयार केली, तिच्यांतील पानांमधून एक नवा धर्म उदय पावलेला आहे आणि त्यानें सर्व विरोधी मतमतांतरांना पुसून टाकून राष्ट्रीय मनाचा पूर्ण कब्जा घेतलेला आहे. सोळाव्या शतकांत युरोपच्या मनावर धर्माची जेवढी जबरदस्त पकड होती, तेवढीच पकड मार्क्सवादानें चीनमधील जनमानसाची घेतलेली आहे. मात्र कम्युनिस्ट 'धर्म' या शब्दाला तुच्छ लेखतात आणि आपल्या श्रद्धांना 'मतप्रणाली' म्हणून गौरवितात. या घरटचांतल्या कोकिळेचा महिमा एवढा मोठा आहे कीं, चीनच्या प्राचीन संस्कृतीचा वारसा कधीं सोयीस्करपणें बासनांत गुंडाळून ठेवला जातो; तर अद्याप अपूर्ण राहिलेल्या क्रांतीच्या पूर्तीसाठीं जेथें त्याची जरुरी लागते, तेथें त्याचा एक प्रेरक शक्ति म्हणून उपयोग केला जातो. एकीकडे जमीनदारीला मूठमाती देण्यांत आली आहे, पण कम्यून्सच्या धर्तीची जीवनाची जडणघडण अद्याप प्रथमावस्थेंतच आहे. सामाजिक आणि आर्थिक क्रांतीचा हा भव्य कार्यक्रम फलद्रूप व्हावयास हवा असेल, तर बहुसंख्य चिनी लोकांनीं या क्रांतीमुळें होणाऱ्या बदलांचा आपल्या जीवनांत स्वेच्छेनें अंगीकार केला पाहिजे, तसेंच कम्युनिस्टपंथीय या नात्यानें या सर्व प्रक्रियेला 'तात्त्विक परिवर्तना'च्या अखंड मार्गावरील एक अनुभवाचा टप्पा म्हणून संबोधिलें पाहिजे. या परिवर्तनाच्या कार्याला हातभार लावण्याबाबत शिक्षण हें मोलाची कामगिरी बजावीत असल्यानें चिनी राष्ट्रांत शिक्षणपद्धती कशी ठेवावी, याला विशेष महत्त्व देण्यांत आलेलें आहे.

मार्क्सच्या पावलावर पाऊल टाकून कम्युनिस्टांनीं शैक्षणिक सुधारणेची एखादी ठरीव योजना अंमलांत आणली नाहीं. तेव्हां अगदीं दिवसादिवसाला नाहीं, तरी वर्षावर्षाला शिक्षणविषयक तंत्रांत धोरणी पालट घडून येणें शक्य असतें. पाश्चिमात्य जग कांहींशा रूढ शिष्टाचाराला धरूनच शिक्षणाकडे पाहतें. त्याला विकासाच्या दृष्टीनें पूर्वनियोजन करावें लागतें, अंदाजपत्रकी तरतुदीशिवाय त्याला पाऊलहि उचलतां येत नाहीं आणि जर का साधनसामग्री किंवा ज्ञानसाधना यांच्या बाबतींत पातळी खालीं येण्याचा धोका वाटला, तर त्याला कसलीहि हालचाल करणें अशक्य असतें. चिनी सरकारपाशीं असा कसलाच सोंवळेपणा नाहीं. चिनी प्रवक्ते उघड उघड म्हणतात कीं, उत्पादनाच्या इतर अनेक साधनांप्रमाणें शिक्षणाचाहि उपयोग

करतां येतो. गरज पडेल त्याप्रमाणें शिक्षणयंत्राची कळ दाबून तें सुरू वा बंद करतां येतें. जेव्हां जेव्हां आणि जेथें जेथें नवनिर्मितीच्या योजनांना खीळ बसल्यागत होईल, तेव्हां तेव्हां आणि तेथें तेथें दुरुस्तीच्या कामासाठीं शिक्षण हात जोडून उभें करतां येईल. विशुद्ध शैक्षणिक वा तांत्रिक हेतूंसाठीं वेळ देण्याची कितीहि गरज असली, तरी त्याचा बळी देऊनहि आपल्या विशिष्ट मतप्रणालीचा प्रचंड ठसा उमटविणें, हेंच त्यांचें प्रमुख शैक्षणिक उद्दिष्ट होऊन बसलेलें आहे.

साहजिकच चिनी शिक्षणविषयक ध्येयें हीं पाश्चात्य लोकशाही राष्ट्रांतील ध्येयांपेक्षां अधिक स्पष्ट आणि सरधोपट आहेत. यांतलें पहिलें ध्येय म्हणजे कम्युनिझमचा अखंड प्रचार आणि त्याच्या खालोखाल दुसरें ध्येय म्हणजे औद्योगीकरण झालेल्या आधुनिक बलशाली चिनी राष्ट्राची निर्मिति. चीनमध्यें शिक्षणाला जें महत्त्व आहे, तें या दोन उद्दिष्टांची परिपूर्ति करण्याचें तें प्रमुख साधन आहे म्हणूनच. नाहींतर शिक्षणाचें स्वतःचें स्वतंत्र अधिकारक्षेत्र आहे वा त्याला स्वतःच्या अशा खास गरजा भागवावयाच्या असतात असें मानून पाश्चात्य देशांत जसें उत्तेजन दिलें जातें, तसें येथें सुतराम् दिलें जात नाहीं. शिक्षणक्षेत्रांतील कार्यपद्धति आणि तींत दिला जाणारा विशिष्ट अंगावरचा भर हा सरकारी गरजेप्रमाणें नेहमीं बदलत असतो. सध्यां चिनी शिक्षणपद्धतींत शारीरिक श्रमांवर जो भर दिला जात असतो, तो परकीय निरीक्षकाला अत्यंत नवलाचा वाटून डोळ्यांत भरतो. शेतकरी आणि कामकरी जनतेच्या बळावर जो पक्ष उभा आहे, त्याची श्रमांच्या प्रतिष्ठेवर नितांत श्रद्धा असणें अवश्यच आहे. सोव्हिएट रशियानेंहि आपल्या शैक्षणिक कार्यक्रमांत हाच दृष्टिकोन सतत वाढीस लावलेला आहे. तसें पाहिलें तर शिक्षण आणि श्रम यांचा समवाय करण्याचा हा सिद्धांत १८४८ सालच्या कम्युनिस्ट जाहीरनाम्याचा एक विशेषच होता. पहिलीं कांहीं दशकें वखवखलेल्या जनतेची भूक भागविण्यासाठीं खर्ची घातल्याखेरीज उद्योगप्रधान आणि शेतकीप्रधान अर्थव्यवस्थेचा गाडा उभाच राहूं शकत नाहीं. परंतु चीनमधील शाळाकॉलेजांच्या अभ्यासक्रमांत मानवी श्रमसायासांचें जें अगम्य वाटण्याजोगें फाजील स्तोम माजविण्यांत आलेलें आहे, त्याचा उलगडा चीनच्या अलिकडच्या इतिहासाधारेंच करतां येतो.

१९५६ सालीं ऑक्टोबरांत झालेल्या हंगेरियन उठावाची जी प्रतिक्रिया चिनी विद्यार्थीजगतांत उमटली, तिनें पक्षामध्यें विचारमंथन सुरू झालें. पुढें 'सगळीं फुलें फुलोत आणि विभिन्न विचारप्रणाली गुण्यागोविंदानें नांदोत' या फसव्या ब्रीदवाक्याचें लोण शाळाकॉलेजांपर्यंत पोंचून त्याला जें अनिष्ट वळण लागलें, त्यामुळें चिंतेच्या वातावरणांत वाढच झाली. १९५६ सालच्या मेमध्यें पक्षाच्या मध्यवर्ती प्रचारविभागाचा प्रमुख लु तिंग-यि यानें या ब्रीदवाक्याचें प्रथम सूतोवाच केलें. २७ एप्रिल १९५७ रोजीं मध्यवर्ती समितीनें दुर्दैवी आदेश दिला आणि तदनुसार सहा आठवड्यांतच जेव्हां पक्षाच्या 'कार्यपद्धती'वर चर्चा करण्यासाठीं अपक्षीय बुद्धिवंतांना पाचारण करण्यांत आलें, तेव्हां तर अगदीं कळस झाला. याच आदेशानुसार देशांतील प्रत्येक व्यक्तीनें राष्ट्रीय श्रमदानांतील आपला वांटा उचलण्यासाठीं पुढें यावें, असें आवाहन करण्यांत आलें होतें. या आवाहनाला विद्यार्थीवर्गानें दिलेला तत्पर पाठिंबा आणि त्या वर्गानें चालविलेली जालीमच नव्हे तर हिंसक टीका यामुळें पक्षाची डोकेंदुखी वाढली. या बाबतींत त्यानें जी दुष्ट बुद्धीची प्रतिक्रिया प्रकट केली, ती गोष्ट आतां इतिहासजमा झालेली आहे. कांहीं असलें, तरी येथून पुढें, सुधारणा घडवून आणण्यासाठींची वा प्रतिबंधक शिक्षा म्हणून शारीरिक श्रमांना चिनी शिक्षणपद्धतींत फार मोठें महत्त्व येणार होतें.

दरम्यान सन १९५७ मध्यें पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतीपूर्वींच एक गोष्ट उघड झाली होती. पेकिंगनें अपेक्षा केली होती कीं, शेतकीचें उत्पादन वाढत जाऊन त्यामुळें औद्योगिक विकासाला हातभार लागेल. पण शेतीच्या उत्पादनाचें मान अपेक्षेपेक्षां कमी पडलें होतें. त्यांतच सोव्हिएट युनियननें देऊं केलेली कर्जमुदत संपत येऊन आतां त्याची परतफेड सुरू झाली होती. या परिस्थितींत विकासकार्य साधावयाचें तर अधिकाधिक काबाडकष्ट, काटकसर आणि कमींत कमी सरकारी मदत या गोष्टी ओघानें आल्याच. शिक्षणासारख्या अनुत्पादक व्यवसायक्षेत्रांत तर या गोष्टी अधिकच खऱ्या होत्या. १९५८ मध्यें काटकसरीच्या अर्थव्यवस्थेनिशीं चीनच्या औद्योगिक विकासाची घोडदौड शक्य तितकी तशीच कायम ठेवण्यासाठीं झटण्याचा निर्णय पक्षानें घेतला. त्यासाठीं, शक्य तेथें, बेताच्या निर्वाहवेतनावर काम करणारें प्रचंड मनुष्यबळ लगामीं लावावयाचें, उत्पादनांच्या एतद्देशीय

पद्धतींचा अवलंब करावयाचा तसेंच हलक्या दर्जाच्या उत्पादनसाधनांचा अवलंब करावयाचा व या मार्गांनीं भांडवलाची उणीव भरून काढावयाची, असें पक्षानें ठरविलें.

मनुष्यबळाच्या मापानें कार्यक्रमाचें मूल्यमापन करणें, हें शिक्षणतज्ज्ञाच्या कक्षेंत बसणारें नाहीं. पण शिक्षणपद्धतींतच मानवी श्रमांची योजना आणि देशी पद्धतींचा अवलंब या गोष्टींवर विशेष भर दिल्यानें, शिक्षणसंस्थांतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक कष्टांतून झालेल्या फायद्याच्या बळावर अक्षरशः शून्यामधून शिक्षणसंस्था विकसित झाल्या आणि त्या स्वतःच्या पायावर उभ्या राहून मार्गस्थ झाल्या. आर्थिक आणि वैचारिक भूमिकेचा हा तर्कशुद्ध परिपाक होता, हें ध्यानांत घेतल्यावांचून या गोष्टींची संगति लागणार नाहीं.

या अहवालांत म्हटल्याप्रमाणें जनमानसावरील शैक्षणिक परिणामाचें केंद्रबिंदु खचितच प्राथमिक, माध्यमिक, उच्च आणि प्रौढ शिक्षणपद्धतींत शोधतां येण्यासारखे आहेत. चिनी जनमानसावर उमटलेला वैचारिक भूमिकेचा ठसा खरोखर जबरदस्त आणि भयानक आहे. पण शिक्षणक्षेत्रांत विचारसरणीची मक्तेदारी नसणें, हें ध्यानांत ठेवणें हितावह आहे. चिनी लोकांची कल्पना, भावना आणि मन यांवर कब्जा मिळविण्यासाठीं चालविलेल्या सर्वांगीण, अवाढव्य प्रयत्नांचा शिक्षणपद्धति हा एक भाग आहे. राष्ट्रांतील एकूण एक सांस्कृतिक भांडारें राजकीय प्रचाराच्या गाड्याला जुंपलेलीं आहेत. तरुण पिढीला बिनीचे शिलेदार बनविलें जात आहे. त्यांच्यामध्यें 'लाल मफलर' संपादन करून नांव मिळविण्यासाठीं तरुणांचा आटोकाट प्रयत्न चालू आहे. तरुण लोक 'यूथ लीग' या संघटनेचे सभासद होत आहेत. कोणत्याहि धर्माला – मग तो ख्रिस्ती, इस्लाम, बुद्ध वा कन्फ्यूसियस कोणताहि असो – त्याला विरोधी श्रद्धांना किंवा प्रतिस्पर्धी विचारनिष्ठांना उत्तेजन देण्याची मुभा ठेवण्यांत आलेली नाहीं. ऐतिहासिक स्मृतिचिन्हें, पारंपरिक लोकनृत्यें, लोककला, ऐतिहासिक किंवा सद्यःकालीन प्रदर्शनें या साऱ्यांमार्फत प्रचाराच्या गाड्याला वंगण घातलें जात आहे. लेखक, नट, कादंबरी, चित्रपट, नाट्य आणि वृत्तपत्र यांना राजकीय कार्याबाहेर स्वतःचें असें अस्तित्व अत्यल्प आहे. राजकारणाची बटीक न होणाऱ्या साहित्यिक वा कलात्मक प्रतिभेला सांदीकोपऱ्यांत पडून राहावें लागत आहे.

✦ ✦ ✦

# भाग पहिला

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 98358
ग्रंथ शाखा (स्वतंत्र प्रत)

## शिक्षणविषयक सिद्धान्त, कल्पना आणि कार्यपद्धति यांतील क्रांति

### १. पाश्चात्य कल्पनांचा त्याग

चिनी कम्युनिस्टांच्या शैक्षणिक प्रयत्नांचा बराच मोठा भाग असा आहे कीं, पाश्चात्य कसोट्या डोळ्यांपुढें ठेवून त्यावर टीका करणें हें खरोखर अप्रस्तुत ठरण्याजोगें आहे. परंतु कांहीं शैक्षणिक कल्पना अशा आहेत कीं त्या आपल्या मानण्यांत सर्व सुसंस्कृत राष्ट्रांनीं सहभागी व्हावें. 'बूर्झ्वा' किंवा 'भांडवलशाही' किंवा 'पाश्चात्य' अशीं नांवें ठेवून कसाहि अधिक्षेप केला, तरी अनुभवाला उतरलेल्या आणि मानसशास्त्र व तर्कशास्त्र यांना धरून असलेल्या त्या कल्पनांतल्या सत्यांशाला रतिमात्र बाध येत नाहीं. कम्युनिस्ट पद्धतीच्या नवसमाजनिर्मितीच्या आपल्या हटेतंडीच्या उपक्रमापायीं इतर राष्ट्रांच्या अनुभवसिद्ध शैक्षणिक सिद्धांतांना धुडकावून लावण्याची वृत्ति चिनी लोकांत अधिकाधिक बळावते आहे. शहरी आणि ग्रामीण अशा राष्ट्राच्या उभय भागांतून कम्यून्सचा उदय होतांच गतिशील शैक्षणिक क्रांतीचा नवा कालखंड सुरू होणार, हें अगदीं स्वयंप्रकाशित असें सत्य होतें. कम्यून्सच्या आगमनामुळें चिनी शिक्षणपद्धति आणि इतर राष्ट्रांतील शिक्षणपद्धति यांच्यामधील वाढत जाणारें अंतर अधिकाधिक नजरेंत भरूं लागलें.

१९६० च्या एप्रिल महिन्यांत पीपल्स कॉंग्रेसमध्यें भाषण करतांना पक्षाच्या मध्यवर्ती प्रचारविभागाचे प्रमुख लु तिंग-यि यांनीं, शिक्षणविषयक, पाश्चात्य रूढ सिद्धांतांविरुद्ध चीनमध्यें बोकाळलेली बंडखोर वृत्ति धिटाईच्या आणि निःसंदिग्ध शब्दांत मांडली. ते शब्द असे :

"आमचा दृष्टिकोन असा आहे कीं, शिक्षणानें श्रमजीवी वर्गाच्या राजकारणाची सेवा केली पाहिजे. बूर्झ्वावर्गाचें म्हणणें असें आहे कीं 'शिक्षण हें शिक्षणासाठीं असतें'; याचा पर्यायानें अर्थ हाच कीं, शिक्षणानें बूर्झ्वावर्गाची चाकरी करावी.... आमची धारणा अशी आहे कीं, श्रमोत्पादक व्यवसायांबरोबर शिक्षणाची सांगड घातली गेली पाहिजे; उलट बूर्झ्वावर्गाचें म्हणणें असें आहे कीं, शिक्षण आणि श्रमोत्पादक व्यवसाय हीं अलग ठेवावीं. आमचें मत असें आहे कीं, जनतेचा कौल घेऊन पक्षानेंच शैक्षणिक धोरण ठरवावें. उलट बूर्झ्वावर्गाला वाटतें कीं, फक्त तज्ज्ञ अध्यापकवर्गच शैक्षणिक धोरण आखूं शकेल."

चिनी कम्युनिस्ट राजवटींतील शिक्षणाचा इतिहास म्हणजे पक्षहुकमतीचे पाश आवळतां आवळतां आज प्रत्यक्ष गळफांस बसण्याची वेळ कशी येऊन ठेपली आहे, त्याचीच कहाणी होय. 'शंभर फुलांच्या' दुर्दैवी प्रचारमोहिमेच्या काळांत कसाबसा ऐकूं येणारा शिक्षणतज्ज्ञाचा कांपरा आवाज आतां बंद पाडण्यांत आलेला आहे.

शासनांत माजलेली बजबजपुरी आणि समृद्धीची सुमार पातळी यांमुळें निर्माण होणाऱ्या शंकाकुशंकांना तोंड देण्यासाठीं म्हणून शैक्षणिक घोषवाक्यें तयार करण्यास पक्षप्रचारकांना फारसे आयास पडले नाहींत. नव्या शिक्षणपद्धतीचा वेल सहजासहजीं मांडवावर जात आहे. शैक्षणिक पातळी ही विद्यार्थ्याच्या बौद्धिक कुवतीवर अवलंबून असते, हें बूर्झ्वामंडळीचें प्रमादजन्य मत आहे. त्यावरील उत्तर 'जनतेचा कौल' घेणारांपाशीं तयार होतें : विद्यार्थ्यांची गटागटानें संघटना करावी, प्रत्येक गटांत हुशार तसेच ढ विद्यार्थीहि असावे; म्हणजे हुशार विद्यार्थी मागें पडलेल्या विद्यार्थ्यांशीं 'करार' करूं शकतात. दरम्यान "विद्यार्थ्याची व्यक्तिशः हुशारी ही कामाची नाहीं; सबंध गटाचा अभ्यास चांगला असला, तरच तिची किंमत" यासारखीं घोषवचनें चलनी झालीं. 'अभ्यासांत जी मोठी तफावत' पडत असते, ती भरून काढण्यासाठीं भाषणें आणि टांचणें यांचा समाईक अभ्यास सुरू आहे. परिच्छेदांमागून परिच्छेदांची, पाठांमागून पाठांची एकत्र चर्चा करून सामुदायिक पद्धतीनें धड्यांचा अभ्यास होत असतो. गृहपाठ सामुदायिक रीत्या लिहून काढले जातात आणि अशा प्रकारें तयार झालेलीं सांघिक-उत्तरें जुनाट, वैयक्तिक ठरीव उत्तरांपेक्षां कितीतरी पटींनीं उठून दिसणारीं असतात !

बूर्झ्वामंडळीची दुसरी चूक म्हणजे कोणत्याहि भरीव आणि तावडतोबीच्या सुधारणेला भिणें! इथें आम्हांला असा दावा सांगितला जातो कीं, अन्य उत्पादनक्षेत्रांतील युक्त्याप्रयुक्त्यांसारखी उपाययोजना करून शिक्षणालाहि हवें तसें वळण लावतां येतें. शाळाकॉलेजांमधून मतप्रणालि आणि राजकारण या दोन बाबतींतच पक्ष नेतृत्व करूं शकतो असें नाहीं; तर अध्यापनकार्य आणि वैज्ञानिक संशोधन या क्षेत्रांतहि तो मार्गदर्शन करूं शकतो.

आतां शिक्षणक्षेत्रांतील तज्ज्ञांची अशी उचलबांगडी करण्यास पाश्चात्य देशांतला कोणताहि राजकीय पक्ष धजावणार नाहीं. पाश्चात्यांच्या मतें असल्या विचारसरणीमुळें शिक्षणाचा बोजवारा उडतो. राजकीय पक्षाचें सदस्यत्व मिळाल्यानें कोणतीहि व्यक्ति कांहीं अध्यापक किंवा संशोधक होण्यास पात्र ठरत नसते. खरी गोष्ट अशी आहे कीं, ज्या कित्येक गोष्टी चिनी कम्युनिस्ट शिक्षणक्षेत्राच्या कक्षेंतल्या समजतात, त्यांना पाश्चात्य दृष्टिकोनां-तून 'शैक्षणिक' अशी संज्ञाच लावतां येणार नाहीं.

मग मोठा मतभेद आहे कोठें? शिक्षणक्षेत्रांत पक्षाची हुकमत कशासाठीं?

कम्युनिस्ट शिक्षणपद्धतीचा इमला तीन पातळ्यांवर, तीन आधारस्तंभांवर उभा आहे. ते आधारस्तंभ म्हणजे 'विशिष्ट मतप्रणालीचें शिक्षण', 'उत्पादक शारीरिक श्रम' आणि 'वैज्ञानिक संशोधन'. अर्थातच कोणत्याहि राजकीय पक्षाला 'विशिष्ट मतप्रणालीचें शिक्षण' देण्यांत आणि 'उत्पादक शारीरिक श्रम' करण्यांत मार्गदर्शन करणें सहज शक्य आहे. आतां तीच गोष्ट वैज्ञानिक संशोधनाची! शास्त्रीय संशोधन हें एखाद्या प्रतिभावंत व्यक्तीचें किंवा उच्च पात्रता संपादन केलेल्या छोटया गटाचें कार्य नव्हे, ती जनतेनें केलेली पाहणी आहे, असें म्हटलें कीं मग प्रश्नच मिटतो. विद्यापीठीय संशोधनकार्याविषयींचा हा एवढा दृष्टिकोन जरी ध्यानांत घेतला, तरी कम्युनिस्ट आणि पाश्चात्य यांच्या शैक्षणिक कल्पनांतील जमीनअस्मानाचें अंतर सहज उघड होईल.

"कामगारांच्या राजकारणाची सेवा आणि उत्पादक शारीरिक श्रमांशीं शिक्षणाची घातलेली सांगड या उभय बाबतींत पक्षीय मार्गदर्शनाची अंमल-बजावणी झाल्यापासून .... चिनी जनतेच्या विद्यापीठाचा पार कायापालट झालेला आहे. अध्यापन हा आधारबिंदु कल्पून अध्यापन, उत्पादक श्रम आणि वैज्ञानिक संशोधन यांचें निकटचें एकसूत्रीकरण केल्यानें शिक्षणाचा दर्जा

खूपच उंचावला आहे.....एका वर्षाच्या आंत विज्ञान विषयांत संशोधनपर असे ६४०० ग्रंथ तयार झाले. मागल्या आठ वर्षांच्या तुलनेनें ही वाढ ६·४ पट आहे. इतःपर वैज्ञानिक संशोधन हें मूठभर व्यक्तींची मिरास राहिलेली नसून तें आतां जनता पार पाडीत आहे. नव्वद टक्क्यांहून अधिक अध्यापक आणि विद्यार्थी शास्त्रीय संशोधनांत भाग घेत असतात. विद्यापीठानें आजवर विज्ञानक्षेत्रांतील हजारांहून अधिक विषयांवर चर्चा घडवून आणल्या. पक्षाचें राजकारण आणि शैक्षणिक कार्य हीं साधण्यासाठीं चीनच्या प्रत्यक्ष गरजेशीं जुळतील अशा वैज्ञानिक विषयांची निवड संशोधनासाठीं करण्यांत आली होती."

वस्तुतः हें 'संशोधन' म्हणजे कम्यून्सच्या प्रश्नावर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांची सामुदायिक चर्चा किंवा समाईक अभ्यास यापलीकडे कांहींच नसतें. धरणबांधणीसाठीं होणाऱ्या श्रमदानाचा गौरवसुद्धां 'संशोधन' या संज्ञेनेंच करण्यांत येत असतो. पेकिंगच्या 'मियुन रिझर्व्हॉयर'च्या बांधणीचें वर्णन करतांना म्हटलें आहे :

"....योजनांचा आराखडा तयार करणारे, कामावर देखरेख करणारे आणि बांधकामाचे मुकादम म्हणून शिक्षक आणि विद्यार्थी बांधकामाच्या स्थळीं गेले आणि दोन लाख कामगारांच्या खांद्याला खांदा लावून त्यांनीं बांधकामाबाबत धैर्यानें मुकाबला केला. त्यांनीं अध्यापन, उत्पादक श्रमशक्ति आणि शास्त्रीय संशोधन यांचें एकसूत्रीकरण करून जणू कांहीं त्या स्थलाचें एखाद्या शैक्षणिक वर्गांत रूपांतर केलें. Tsinghua विद्यापीठानें घालून दिलेला कार्यपद्धतीचा हा धडा पेकिंगमधल्या विविध उच्च शिक्षणसंस्थांनीं गिरविला."

ज्या शिक्षण खात्यानें शिक्षणाचा उच्च दर्जा राखण्यासाठीं झगडावयाचें अशी अपेक्षा करावयाची, तें विशुद्ध शैक्षणिक उद्दिष्टांना चालना देण्याच्या कामीं असमर्थच आहे. शिवाय शिक्षणविषयक धोरणासंबंधीं पक्ष आणि पक्षाची प्रचारयंत्रणा याहून या शिक्षण खात्याला वेगळें असें स्थानच नाहीं. खरें म्हणजे चीनमध्यें शैक्षणिक क्षेत्रांत आज जें जें घडत आहे, त्याचा शिक्षणखात्याशीं सुतराम् संबंध नाहीं. पक्षीय यंत्रणा आणि शासनसत्ता किंवा कारभार यांची वेगळीक शोधून काढणें यापुढें अगदीं अशक्य होऊन बसलें आहे. फक्त असंघटित अशा व्यक्तीच कांहीं निषेधपर आवाज उठवूं शकतात. आपापल्या हुद्द्यावर असलेले 'उजव्या' गटाचे लोक आहेत, ते आज्ञेविरुद्ध बंडखोरी

करण्याचें धैर्य असलेल्यांना सुप्त सामर्थ्याचे आदर्श म्हणून उपयोगी पडण्यासारखे आहेत. शिक्षणसंस्थांची उभारणी, संघटना आणि प्रत्यक्ष कारभार करण्यासाठीं इतर समाजांत शिक्षणतज्ज्ञांची आवश्यकता असते, अशा तज्ज्ञांची गरज चीनमध्यें दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे. शैक्षणिक क्षेत्रांतला हा माणूस तात्त्विक दृष्ट्या 'लाल आणि तज्ज्ञ असावयास हवा'; परंतु प्रत्यक्षांत मात्र तो 'तज्ज्ञ' असण्यापेक्षां 'लाल' असण्याची शक्यताच अधिक आहे. या घटनांचा अर्थातच एक फायदा आहे. तो म्हणजे स्थानिक मार्गदर्शन आणि प्रयत्न यांनीं हें गाडें उभारणार असें म्हटलें कीं, स्थानिक पैशावरच तें चालणार! राष्ट्रीय उत्पन्नापैकीं अकरा टक्के उत्पन्न आपण शिक्षणावर खर्च करतों, असा दावा सांगण्यांत येत असला, तरी पेकिंगनें शिक्षणक्षेत्रांत आर्थिक दृष्ट्या पुढाकार घेण्याचें वा कब्जा ठेवण्याचें धोरण, सध्यां कांहीं काळ तरी सोडून दिलेलें आहे.

चीनच्या शिक्षणासंबंधींचीं कांहीं गृहीत कृत्यें मान्य करावींच लागतात. त्यांतलें मुख्य म्हणजे पाश्चिमात्य जगतांतील शिक्षणाची आणि चीनमधील शिक्षणाची कक्षा अगदीं भिन्न आहे. येथें शिक्षणक्षेत्रांत पक्षाचें मार्गदर्शन आणि हुकमत चालूं शकते. ती कशी आणि कोणत्या थरापर्यंत चालते, हें पाहणें म्हणजेच चीनमधील सद्यःकालीन शैक्षणिक घडामोडींचा इतिहास होय.

✦✦✦

## २. शिक्षणामागील पक्षप्रेरणा

कम्युनिस्ट पक्ष हा घाईंत असलेला पक्ष आहे आणि शिक्षण ही वादळांत लोटलेली नौका आहे. आर्थिक दृष्ट्या, देशानें दुसरी पंचवार्षिक योजना (१९५८–६२) पूर्ण केली आहे; पण दीर्घमुदतीच्या अशा योजनांशीं शैक्षणिक विकासाचा जिव्हाळ्याचा संबंध आहे असें दिसून येत नाहीं. १९५९ आणि १९६० या दोन वर्षांत चीनवर अनेक आर्थिक आपत्ति आल्या. कम्यून्सचा जबरदस्तीनें केला जाणारा विकास, त्याहीपेक्षां कामगारवर्गाच्या मागण्या पुऱ्या करतांना झालेली सक्ति आणि अगदीं असह्य नाहीं तरी गंभीर स्वरूपाचा कांहीं प्रांतांमध्यें पडलेला अन्नधान्याचा तुटवडा या गोष्टींच्या

रूपानें सर्वसामान्य चिनी माणसाला या आपत्तींची झळ सोसावी लागली. या पार्श्वभूमीवर केवळ दीर्घ मुदतीचें शैक्षणिक नियोजन अवश्य तीं उत्तरें देऊं शकत नाहीं. चीनपुढें असलेल्या दैनंदिन समस्यांचा अभ्यास झाला पाहिजे, त्या हातीं घेतल्या पाहिजेत आणि शिक्षणक्षेत्राचें जाळें एकंदरींत असें कांहीं पसरलें पाहिजे कीं, प्रत्येक व्यक्ति स्वतःला यथायोग्य रीतीनें बसवून घेऊन हातभार लावण्यास अधिक उपयुक्त ठरेल. क्रांतीची चेतवणी आणि शैक्षणिक यंत्रणेची उभारणी अशी कांहीं लोकप्रिय करावयाची कीं, इमारत बांधणी-साठीं आणि अध्यापकनिर्मितीसाठीं आंखलेल्या पद्धतशीर योजना तसेंच द्रव्यनिधीच्या दैनंदिन विनियोगासाठीं आंखलेल्या योजना यांना डावलल्या-मुळें ज्या कमतरता निर्माण झालेल्या आहेत, त्या पाश्चात्य निरीक्षकाच्या नजरेंत न याव्या. ज्या गृहीत तत्त्वांचें पक्षाला मुळींच सोहेरसुतक नाहीं, अशा गृहीत कृत्यांनीं पाश्चात्य निरीक्षकाच्या डोळ्यांत धूळफेंक करावयाची. १९५९ आणि १९६० मध्यें पाश्चात्य जगताला अभूतपूर्व वाटावा असा शिक्षणक्षेत्रांतील नव्या उपक्रमांचा उठाव चीनमध्यें झाला. चीनची शिक्षण-पद्धति म्हणजे राष्ट्राच्या संघटित आत्म्याचा आविष्कारच होय; किंवा मार्गांत पर्वत जरी आडवे पडले, तरी जनतेची प्रतिकारशक्ति त्यांना हालवूं शकते या विश्वासाचीच ती जणूं अभिव्यक्ति होय !

कम्युनिस्ट शिक्षणपद्धतीच्या उद्दिष्टांची यादी येणेंप्रमाणें करतां येईल :

(१) चिनी लोकांच्या वैचारिक परिवर्तनासाठीं शिक्षणाचा हातभार लागेल, असें करणें. त्यासाठीं पक्षाची मतप्रणालि अधिक जोरदारपणें बिंबेल असें शिक्षण देणें आणि पक्षाची सर्वंकष हुकमत वाढविणें या मार्गांचा अवलंब करण्यांत आला.

(२) देशाच्या अर्थकारणास शिक्षणाचा हातभार लागेल असें करणें. या बाबतींत योजलेलें हत्यार म्हणजे उत्पादक शारीरिक श्रम.

(३) जनतेच्या जीवनांत शिक्षणाचें वारें सर्वत्र खेळविणें–कम्युनिस्टांच्या शब्दांत सांगायचें तर शिक्षण लोकप्रिय करणें. या बाबतींत योजलेला मार्ग म्हणजे सर्व पातळ्यांवरील आणि सर्व दर्जाच्या शिक्षणाचा विकास स्थानिक पैशांतून स्थानिक रीतीनेंच साधावयाचा आणि अशा रीतीनें स्थानिक सामर्थ्याच्या बळावर स्थानिक गरजा भागवावयाच्या.

हीं उद्दिष्टें प्रत्यक्षांत परस्परव्यापक असलीं, तरी त्यांतूनच त्यांच्या प्रेरकहेतूंचें स्पष्ट दर्शन होण्यासारखें आहे.

१९ सप्टेंबर १९५८ रोजीं पक्ष आणि सरकार यांनीं जें संयुक्त सूचनापत्रक काढलें, तें प्रचलित शैक्षणिक धोरणाच्या अभ्यासाचा स्वाभाविक प्रारंभबिंदु ठरतो :

" वस्तुस्थितीकडे डोळेझांक केल्यानें, कांहीं अंशीं राजकारणाकडे दुर्लक्ष केल्यानें, तसेंच पक्षाच्या मार्गदर्शनाची हेळणा केल्यामुळें अध्यापन आणि उत्पादक श्रमशक्ति यांची फारकत झाली आणि शैक्षणिक कार्यांत आजवर अपयश आलेलें आहे. नऊ वर्षांच्या कार्याचा मोठा अनुभव आपल्या गांठीं आहे. आपला पक्ष आणि राज्यांतील शिक्षणपद्धति यांची अधिक सुस्पष्ट आणि अधिक योजनाबद्ध आंखणी करण्यास आतां आपण समर्थ झालों आहोंत."

✦ ✦ ✦

## ३. मतप्रणालीचें शिक्षण

कम्युनिझम हा जसा जागतिक तसाच राष्ट्रवादी दृष्टिकोन आहे. त्यामुळें कार्यप्रचाराला हातभार लावण्याचा शिक्षणाचा उपक्रम केव्हां थांबेल, याचा नेम कधींच सांगतां येत नाहीं :

" जनमानसांतील कम्युनिस्ट पंथाची जाणीव आणि नैतिकता उंचावणें आणि लोकमतावरील बूर्झ्वा विचारसरणीचा पगडा संपूर्णपणें नेस्तनाबूद करणें, हें मतप्रणालीच्या आघाडीवरील दूरगामी असें अतिशय महत्त्वाचें कार्य होय..... विशिष्ट प्रकारची मतप्रणालि या दृष्टीनें कम्युनिझम हा मार्क्स आणि लेनिनप्रणीत ऐतिहासिक भौतिकवादी आणि द्वंद्वात्मक भौतिकवादी दृष्टिकोन आहे. कम्युनिझम हें फार पुढारलेलें शास्त्र असून अत्यंत क्रांतिकारक असा जागतिक दृष्टिकोन आहे. क्रांतीशीं एकनिष्ठ असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीनें या जागतिक दृष्टिकोनाबाबत प्रभुत्व मिळविण्यासाठीं झटलें पाहिजे."

विद्यार्थ्यांच्या मनांत विभागलेल्या निष्ठांना यत्किंचितहि थारा असतां कामा नये :

"आमचें सर्वस्व पक्षाच्या मालकीचें आहे. आम्ही पक्षासाठींच अभ्यास करीत आहोंत."

यावरून हें स्पष्ट होतें कीं, 'मतप्रणालींतील सुधारणे'ला कम्युनिस्ट शिक्षणांत फार महत्त्वाचें स्थान आहे. त्यासाठीं मार्क्सवाद, लेनिनवाद आणि माउत्से-तुंगचे ग्रंथ व प्रचलित घटनांवरील चर्चा यांचा अभ्यास करावा लागत असे. 'उदात्त कम्युनिस्ट नीती'चें साध्य होणें आणि भांडवलशाही-विरुद्ध चाललेल्या जागतिक लढ्यांत यश मिळणें या गोष्टी या शिक्षणाशीं निगडित आहेत. मतप्रणाली हेंच शिक्षणाचें अनंत काळपर्यंत आद्य कर्तव्य राहणार आहे. १९६० च्या जूनमध्यें सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतील श्रेष्ठ कार्यकर्त्यांची पेकिंग येथें जी पहिली राष्ट्रीय परिषद् भरली, तिनें अध्यक्ष माओला एक संदेश पाठविला होता. त्या संदेशांत म्हटलें होतें :

"सर्व राष्ट्रांतील लोकांचा दुष्ट शत्रु जो अमेरिकन साम्राज्यवाद, त्याला आम्ही कसून विरोध करूं. आम्ही तथाकथित 'पाश्चात्य संस्कृती' मधील प्रतिक्रांतिकारक कल्पनांशीं आणि तथाकथित 'स्वातंत्र्य, समता आणि बंधुता' यांच्याशीं निकरानें सामना देऊं..... धोरणांत दुरुस्ती व्हावी, असें म्हणणाऱ्या आधुनिक रिव्हिजनिस्ट देशद्रोह्यांचे बुरखे आम्ही सपशेल फाडून टाकूं, त्यांनीं फैलावलेलें वैचारिक विष धुऊन टाकूं, कामगारांत फूट पाडणाऱ्या घातपाती कारवायांचा नायनाट करूं..... कम्युनिझम दृढमूल होईपर्यंत साम्यवादी विचारसरणी आणि भांडवलशाही विचारसरणी यांतून कोणती विजयी व्हावयाची, यासाठीं चाललेला वैचारिक लढा हेंच सांस्कृतिक क्रांतीचें मुख्य ईप्सित राहील."

कोणी असें समजूं नये कीं, उच्च शिक्षण किंवा प्रतिभावंत विद्वान पक्षाच्या नजरेंतून सुटेल. उलटपक्षीं :

"बुद्धिमान लोकांच्या विचारसरणीची पुनर्रचना हा दीर्घकाळपर्यंत चालणारा व संकीर्ण स्वरूपाचा झगडा आहे. सुधारणेची मोहीम आणि शैक्षणिक क्रांति घडून आल्यावरहि अद्याप असे कांहीं लोक आहेत कीं, जे राजकारणांतून बाहेर फेकले गेल्यावर आतां बूर्झ्वामंडळीच्या शैक्षणिक तत्त्वांना घट्ट कवटाळून बसलेले आहेत, तज्ज्ञांच्या कार्यावर भर देणाऱ्या

बूर्झ्वा लोकांच्या शिक्षणविषयक दृष्टिकोनाला चिकटून बसलेले आहेत. ते शिक्षणक्षेत्रांतील आणि वैज्ञानिक क्षेत्रांतील जनतेच्या विचारसरणीला विरोध करीत असतात, शिक्षण आणि उत्पादक श्रमशक्ति यांची सांगड घालणाऱ्या शिक्षणपद्धतीला ते विरोध करीत असतात; इतकेंच नव्हे, तर शिक्षण-क्षेत्रावरील आणि शास्त्रीय संशोधनाच्या क्षेत्रावरील पक्षाची हुकमत मान्य करण्यासहि ते राजी नाहींत. राजकारणाच्या दृष्टीनें शाळांचें मूलभूत कार्य म्हणजे कामगारांच्या विचारसरणीचा प्रसार करणें, बूर्झ्वा विचारसरणीचा नायनाट करणें, तसेंच विचारवंतांच्या जागतिक दृष्टिकोनावर मूलगामी अशी उपाययोजना शोधून काढणें..... राजकारणविषयक शिक्षणांत मार्क्सवाद आणि लेनिनवाद यांची प्रचलित घडामोडींशीं आणि ध्येय-धोरणांशीं सांगड घातली पाहिजे. तसेंच राजनैतिक अभ्यासाबरोबर पद्धतशीर टीकेचा—म्हणजे एका बाजूनें आत्मपरीक्षणात्मक टीका तर दुसऱ्या बाजूनें मधूनमधून होणारी सुधारणा मोहीम यांचा—मेळ घातला पाहिजे.”

याचा स्पष्ट अर्थ असा कीं, नव्या संपूर्ण कम्युनिस्ट पुरुष आणि स्त्री यांच्या निर्मितीची गुरुकिल्ली वैचारिक शिक्षणांत आहे. यांतूनच तांत्रिक शिक्षण आणि नैतिक शिक्षण सहकार्यानें पुढें जातील याची शाश्वती देतां येते. तसेंच दुसऱ्या प्रकारच्या बोधामृताचे डोस भरपूर प्रमाणांत आत्मसात् केल्याशिवाय पहिलें अंगीं बाणणें शक्य नाहीं. त्यानें धर्माचें स्थान पटकावलें असून त्यामुळें नव्या नीतीचें शिक्षण मिळतें :

“श्रमजीवी वर्गांतील बुद्धिवंतांनीं स्वतःजवळ कांहींएक न ठेवतां, आपलें सर्वस्व लोकांसाठीं आणि साम्यवाद व कम्युनिझमच्या कर्मासाठीं वाहावयाचें असा निश्चय केला आहे. त्यांना याची जाणीव आहे कीं, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक उपक्रम हे पक्षाच्या नेतृत्वाखालीं चाललेले लाखों लोकांसाठीं होणारे उपक्रम आहेंत. उलटपक्षीं बूर्झ्वागटांतील विद्वानांचा जगाकडे पाह-ण्याचा दृष्टिकोन स्वयंकेंद्रित आणि आदर्शवादी आहे. परिणामीं प्रत्येक गोष्ट वैयक्तिक फायद्यासाठीं केली जाते व स्वतःची प्रगति हेंच त्याचें जीवितध्येय असतें. त्यांच्या मतें विज्ञान आणि तांत्रिक ज्ञान ही मूठभर लोकांची मिरास असते व त्यांचा अभ्यास आणि त्यांवरील प्रावीण्य हें व्यक्तीची कीर्ति आणि दर्जा वाढावा, एवढ्याचसाठीं असतें. आमची क्रांतिप्रवण तरुणपिढी या बूर्झ्वा मंडळीच्या मार्गानें कदापि जाणार नाहीं.”

✦ ✦ ✦

## ४. उत्पादक श्रम

**१९५८** सालापासून सर्व शिक्षणसंस्थांमधून मतप्रणालीच्या बौद्धिक शिक्षणाबरोबर, अभ्यासक्रमाचें एक महत्त्वाचें अंग म्हणून उत्पादक श्रमांची सांगड घालण्याचा उपक्रम नव्या पद्धतीनें जारी झाला. शिक्षण आणि शारीरिक श्रम यांची फारकत ही हजार वर्षांइतकी जुनी आहे, हा चिनी प्रचारकांचा दावा, अर्थातच, सर्वथैव सत्य आहे. पूर्वेकडे कन्फ्यूसियस आणि पश्चिमेकडे प्लेटो या दोघांनीं शिक्षणाचा मोहरा शारीरिक कष्टांच्या विरुद्ध दिशेला फिरवून आणि तांत्रिक शिक्षणाला तुच्छ लेखून गंभीर स्वरूपाची हानि करून ठेविली आहे. अशा प्रकारच्या पुनर्नूतनीकरणाच्या प्रयत्नांत चीन हें एकटेंच राष्ट्र पुढें आहे असें नाहीं; सध्यां एक शैक्षणिक शक्ति म्हणून शारीरिक कष्टांचा गौरव अभूतपूर्व अशा भयानक हिरीरीनें पश्चिमेंतहि चालू आहे. उत्पादक श्रमांमुळें शाळाकॉलेजांना फायदा होतो किंवा आर्थिक मदत होते, एवढेंच नव्हे, तर अशा रीतीनें चिनी श्रमशक्तीचें बळ वाढल्यानें जनतेला शिस्त लावण्याच्या दृष्टीनेंहि तें पक्षाच्या हातांतलें उपयुक्त साधन बनलेलें आहे. शिक्षणसंस्था या उत्पादन-केंद्रें बनल्या आहेत आणि उत्पादन-केंद्रें शिक्षणसंस्थांचें उत्पादन करूं लागलीं आहेत. अर्ध-वेळ काम अर्ध-वेळ अभ्यास असा अभ्यासक्रम हें आधुनिक चीनच्या शैक्षणिक जडणघडणीचें खास वैशिष्टच ठरलें आहे :

"सर्व दर्जाच्या शाळांनीं आपापल्या शैक्षणिक योजनांत एक आवश्यक विषय म्हणून उत्पादक श्रमांना स्थान दिलेंच पाहिजे आणि सर्व विद्यार्थ्यांनीं वेळापत्रकांत नेमल्याप्रमाणें उत्पादक श्रमांमध्यें भाग घेतलाच पाहिजे..... उत्पादक श्रमांच्या तीन मूलभूत स्वरूपांत ते भाग घेत असतात. पहिलें म्हणजे ते शाळांनीं चालविलेल्या कारखान्यांत किंवा शेतांवर काम करतात. यामुळें उत्पादक श्रमासाठीं लागणाऱ्या नियमितपणामुळें आणि शिस्तबद्धतेमुळें एकंदर अध्यापनव्यवस्थेंत सुसूत्रता येण्यास साहाय्य होतें. दुसरें म्हणजे ते कारखाने किंवा जनतेच्या कम्यून्स यांच्याशीं सहकार्य करतात किंवा करार करून कारखान्यांत किंवा ग्रामीण भागांत कामाला जातात. यामुळें शिक्षक आणि विद्यार्थी यांचा कामगार आणि शेतकरी यांच्याशीं संपर्क येतो व

मराठी ... ग्रंथ ...
दा. क्र. २८३६६



विद्यार्थीवर्गाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावतात. तिसरें म्हणजे ते समाजकल्याण कार्यांत सहभागी होतात.... त्यांनीं दहा लाख टन लोखंड तसेंच कित्येक हजार टन रासायनिक द्रव्यें व तयार जिनसा यांचें उत्पादन केलें आहे. त्यांनीं विस्तृत भूप्रदेशावर वृक्षांची लागवड केलेली आहे व हस्तव्यवसायाचा आणि दुय्यम शेतकी उत्पादनाचा विकास साधला आहे."

लु तिग-यि यांनीं हा मुद्दा पुढीलप्रमाणें ठांसून मांडला आहे :

"सांस्कृतिक क्रांति याचा अर्थ असा कीं, कामगारांच्या आणि शेतकऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी बुद्धिमान होणें आणि बुद्धिमान लोक कामकरी होणें.... पिळवणूक करणारा वर्ग शारीरिक श्रमांना आणि शारीरिक श्रम करणारांना तुच्छ लेखतो. आम्ही शारीरिक कष्ट हे मानवी जीवनाची प्राथमिक गरज समजतों. आम जनतेला सुसंस्कृत, साम्यवादी, कामकरी बनतां येईल, अशी आम्ही तरतूद करूं."

१९५९ सालीं वेळोवेळीं वृत्तपत्रांमध्यें लेख लिहून, शारीरिक कष्टांचा जादा ताण पडल्यास अध्ययनअध्यापनाकडे दुर्लक्ष होईल, या जाणिवेचें सांत्वन करण्याची सारखी, खटपट चालू होती :

"कांहीं मंडळी म्हणालीसुद्धां : 'उत्पादक श्रम आणि राजकीय चळवळी यांमुळें शाळेची नित्याची घडी विस्कटते, शाळा ही शाळा रहात नाहीं.' हा दृष्टिकोन संपूर्णतः चुकीचा आहे. महत्त्वाचा प्रश्न हा आहे कीं, कसल्या प्रकारची 'नित्याची घडी' आपल्याला अभिप्रेत आहे! ..... (चिनी) शैक्षणिक क्रांतीची सर्वांत मोठी कामगिरी ही आहे कीं तिनें भांडवलशाहीची 'नित्याची घडी' संपूर्णपणें मोडली आणि कामगारवर्गाची 'नित्याची घडी' तिनें बसविली. याचा अर्थ असा कीं, शाळांमधून पक्षीय नेतृत्वाचे पाय पक्के रोंवले गेले, राजकारणाचा वरचष्मा सुरू झाला आणि मार्क्स आणि लेनिनवादी शिक्षणाची पकड घट्ट बसली. नव्या चिनी राष्ट्रांतील विद्यार्थी आज केवळ शास्त्रीय आणि सांस्कृतिक ज्ञानाचें अध्ययन करतात असें नव्हे, ते राजकारणहि अभ्यासतात, तसेंच अभ्यासाप्रमाणें श्रम करण्यांतहि गंभीरपणें मन घालतात. .... या नेहमीपेक्षां वेगळ्या पण आनंदाच्या जीवनक्रमांतून चांगल्या कम्युनिस्टांची व तज्ज्ञांची एक पिढी—श्रमिकवर्गाच्या बुद्धिमंतांची पिढी—पक्षाच्या देखरेखीखालीं जन्म घेत आहे."

पाश्चात्य देशांमध्यें शारीरिक श्रमांचा अंतर्भाव करणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमांमधून तांत्रिक क्षेत्रांतील अर्थपूर्ण असे अनुभव अपेक्षिले जातील. शिक्षणक्रमांतील शारीरिक श्रमांचा भाग सीमित आणि निवडक असावा, अशी सूचना जरी चीनमध्यें केली जात नसली, तरीसुद्धां व्यावहारिक अनुभव आणि तांत्रिक निपुणता यांतील दुवा जुळला पाहिजे या गोष्टीवर भर दिलेला आहे :

" उत्पादन आणि व्यवहार यांपासून फारकत केलेलें नुसतें पुस्तकी ज्ञान देण्यांतच जुन्या शिक्षणपद्धतीमधील मूलभूत उणीव होती. आम्ही आमच्या वर्षभराच्या शैक्षणिक क्रांतीमध्यें शैक्षणिक कार्यक्रमांत आणि विज्ञानविषयक संशोधनाच्या नित्याच्या कार्यांत उत्पादक श्रमांना अंगभूत असें स्थान देऊन या परिस्थितींत संपूर्णपणें बदल घडवून आणला आहे.... उत्पादक श्रम, शास्त्रीय संशोधन आणि सामाजिक व्यवहार यांच्या योगानें शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या फार मोठ्या समुदायानें अगदीं सुस्पष्ट आणि अभिनव स्वरूपाचें व्यवहारज्ञान आणि अनुभव आपल्या गांठीला बांधला आहे. "

✦ ✦ ✦

# ५. स्थानिक पक्षसत्ता आणि शिक्षणप्रसार

शैक्षणिक व्यवस्थेमधील एक प्रमुख राजकीय उद्दिष्ट म्हणजे शाळाकॉलेजांवरील स्थानिक पक्षसमित्यांची पकड अधिक वाढविणें :–

" सर्व शिक्षणसंस्थांच्या व्यवस्थापक-मंडळांनीं आणि शाळांनीं पक्षसमित्यांचें मार्गदर्शन शिरोधार्य मानलें पाहिजे. "

याचा आर्थिक दृष्टचा परिणाम म्हणजे पेकिंगच्या केंद्रसरकारला असह्य झालेल्या आर्थिक बोजांतून मुक्त करणें. शिवाय दुसरें लक्षांत ठेवण्यासारखें शैक्षणिक उद्दिष्ट म्हणजे सर्व पातळ्यांवर शिक्षण लोकप्रिय करून आधुनिक पद्धतीच्या औद्योगिक व शेतकीविषयक अर्थकारणांतील आपला वांटा पूर्णपणें उचलण्यासाठीं चिनी राष्ट्राची तयारी करणें. क्रांतीचा भाग म्हणून हीं धोरणें अमलांत आणतांना कम्यून्स आपलें सर्व सामर्थ्य प्रकट करीत असतात.

प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ अभ्यास असा अभ्यासक्रम असणाऱ्या शाळा, धंदेशिक्षणाच्या शाळा, उच्च शिक्षणसंस्था आणि 'विविधलक्ष्यी' विद्यापीठें कम्यून्सनीं उभीं केलीं आहेत आणि नवी उभारणी चालूच आहे. हेंहि ध्यानांत घेतलें पाहिजे कीं, शिक्षणसंस्थांची निर्मिति केवळ कम्यून्सकडून होते असेंहि नाहीं; कारखाने, शेतकी केंद्रें आणि सरकारी व्यापारी संघटना आपापल्या गरजा भागविण्याच्या दृष्टीनें शिक्षण-संस्थांची उभारणी करीत आहेत. शैक्षणिक विकासावीं सर्वसामान्य धोरणें पक्षाची मध्यवर्ती समिति ठरवून देते आणि पक्षाच्या स्थानिक समित्या शाळांची संघटना, उभारणी आणि योगक्षेम चालवतात. आज प्रचंड प्रमाणा-वर उभ्या राहिलेल्या शैक्षणिक संस्थांची प्रत्यक्ष जबाबदारी शिक्षणखात्या-कडे नाहीं. क्रमिक पुस्तकें तयार करणें, अध्यापकांना प्रशिक्षण देणें आणि कांहीं उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांचें नियंत्रण करणें यासाठींच या खात्याची शक्ति खर्ची पडते; पण याहि क्षेत्रांत सर्वच्या सर्व मक्तेदारी खात्याकडे आहे असें नाहीं. प्राथमिक, माध्यमिक व बऱ्याचशा उच्च शिक्षणसंस्था यांवर सत्ता आणि योगक्षेम या बाबतींत प्रांत, शहर, शेतकी केंद्रें, कारखाने किंवा कम्यून्स यांचा पक्षामार्फत ताबा चालत असतो. कोणत्याहि शाळेच्या अध्यक्षाला वा शाळाप्रमुखाला पक्षाचें मार्गदर्शन धाब्यावर बसवितां येत नाहीं. खरीखुरी सत्ता स्थानिक पक्षसमितीच्याच हातीं असते आणि तिला शाळाप्रमुखांच्या डोक्यावर स्वतंत्र असा आपला निरीक्षक प्रत्येक शाळां-मधून ठेवतां येतो. या बाबतींत दिल्या गेलेल्या सूचना अगदीं स्पष्ट आहेत :

"पक्षसमित्यांच्या जबाबदार सभासदांनीं आणि पक्षाच्या सर्वसामान्य शाखेच्या सभासदमंडळानें कार्यविभागणीच्या तत्त्वानुसार प्रत्येक शैक्षणिक विभागाशीं, प्रत्येक वर्गाशीं आणि प्रत्येक अध्यापन-संशोधनगटाशीं व्यक्तिशः संपर्क साधावा. त्यांनीं वर्गांत दिल्या जाणाऱ्या व्याख्यानांत भाग घ्यावा, वर्ग चालू असतां व अध्यापन-संशोधनकार्य चालू असतां उपस्थित रहावें, संघटनेच्या कामांत भाग घेऊन बारीकसारीक माहिती मिळवून कामाचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा. विशेषतः अध्यापनकार्याचें आकलन करण्याच्या अनुभवाबाबत आपण अद्याप नवखे आहोंत, तेव्हां तो शिकून घेत असतां आपण विनीत वृत्तीच ठेवली पाहिजे."

सरकारच्या वतीनें ज्या ज्या आघाडयांवर कार्य चालू आहे, त्यांपैकीं इतर क्षेत्रांइतकीच प्रचंड क्रांति शिक्षणक्षेत्रांतहि घडून येत आहे. शिक्षण-क्षेत्रांतील बाह्य, आंतर आणि आत्मिक स्वरूपाच्या या क्रांतीचा सूत्रधार चिनी कम्युनिस्ट पक्षच आहे.

शैक्षणिक प्रयत्न चालू असलेल्या सर्व शाखांतील संख्या वाढत्या प्रमाणावर आहे. अर्थात् तिचा संबंध चीनच्या अफाट लोकसंख्येशीं जोडावा लागतो. दरम्यान शैक्षणिक क्षेत्रांत गांठलेल्या गुणयुक्त पातळीविषयीं मात्र बोलणें कठिण आहे. ही पातळी कितपत असावी, याचें मूल्यमापन करण्याच्या परि-स्थितींत खुद्द शिक्षणखातेंहि नाहीं. अपेक्षित अशी व्यावसायिक उच्च पातळी मिळविण्याच्या दृष्टीनें शिक्षणपद्धतींतील कांहीं टप्प्यांवर दीर्घकालीन कष्टांची जरुरी पडते. यांतून निष्कर्ष असा निघतो कीं, शैक्षणिक तज्ज्ञांच्या बाबतींत चीनला इतर राष्ट्रांवर विशेषतः सोव्हिएट युनियनवर आणखी किती काळ अवलंबून रहावें लागेल, याचा नेम नाहीं आणि परदेशीं शिक्षण घेऊन तयार झालेल्या चिनी गणितज्ञांना, शास्त्रज्ञांना आणि तंत्रज्ञांना आकर्षित करण्याचा सतत प्रयत्न चीन चालू ठेवील. कदाचित् एक दिवस असा उगवेल कीं, शास्त्रज्ञ तयार करण्याच्या बाबतींत चीन सर्व जगांत आघाडीवर असेल. अजून ती वेळ आलेली नाहीं. त्यासाठीं निव्वळ उत्साह आणि घाम यांपेक्षां आणखी बऱ्याच गोष्टींची आवश्यकता आहे. पण त्याबरोबरच विशिष्ट मतप्रणाली, श्रमशक्ति आणि सांघिक प्रयत्न यांचें खरें स्वरूप विसरून चाल-णार नाहीं. या गोष्टी म्हणजे अभूतपूर्व अशा जिद्दीच्या आणि तपश्चर्येच्या काळांतील प्रेरकशक्ति,—जणं डायनॅमोसारखी गतिमान करणारी विद्युत-शक्तीच—होय.

□ □ □

## भाग दुसरा

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वकम
अनुक्रम ...१०५६९१... वि ...निबंध
क्रमांक ...२०९८... नों दि ...२०।३।०९

□□

## शिक्षणक्षेत्रांतील विविध पातळ्यांवरील महत्त्वाच्या घडामोडी

□□

### ६. प्राथमिक शाळा

**१९५८** अखेर प्राथमिक शाळांची संख्या ९,३६,००० होती आणि पटावरील मुलांची एकूण संख्या ९२.६१ दशलक्ष म्हणजे १९५७ सालापेक्षां ४४ टक्क्यांनीं अधिक होती. १९५८ सालीं घेतल्या गेलेल्या 'पुढच्या प्रदीर्घ झेपेमुळें' प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक झालें, असा भास निर्माण करण्यासाठीं हा दावा होता. पण तो अर्धकच्चा होता. कांहीं महिन्यांच्या आंतच शिक्षणमंत्र्यांना या आंकडेवारीला मुरड घालावी लागली. ते म्हणाले कीं, प्राथमिक शाळांतून ८६ दशलक्षांहून अधिक मुलें होतीं. ही संख्या शाळेंत जाण्यास योग्य झालेल्या मुलांच्या एकंदर संख्येच्या ८५ टक्के इतकी असून 'पुष्कळशा शहरांमधून' सार्वत्रिक प्रमाणावर प्राथमिक शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेलेली आहे. १९६० सालच्या वसंतऋतूंत हा दावा ८७ टक्क्यांपर्यंत गेला.

किंडरगार्टन पद्धतीच्या पूर्वप्राथमिक शाळांत पंचवीस दशलक्ष बालकें दाखल झालेलीं होतीं. शिक्षणमंत्र्यांनीं हा आंकडा एकतीस दशलक्षांपर्यंत फुगवून सांगितला.

✦✦✦

### ७. शिक्षकांची समस्या

**या** आंकडेवारीशीं निगडित असणारी गंमतीची समस्या म्हणजे गृहीत धरलेली शिक्षकसंख्या कशी पैदा करावयाची ही. या बाबतींत शिक्षणखातें फार मोठा गाजावाजा करीत पुढें येईल, अशी अपेक्षा होती. पण तसें घडलेलें नाहीं. प्रांतिक सरकारें आणि नगरपालिका यांनीं वेळोवेळीं नोंद करून मान्य

केलेलें आहे कीं ' सध्यांचें निकडीचें कार्य ' म्हणजे शिक्षकवळ कसें उभें करावयाचें ! या बाबतींत तीन मार्ग सुचवले गेले : संपूर्ण वेळ वा अर्ध-वेळ प्रशिक्षण देणारीं नमुनेदार (normal) कॉलेजें फार मोठ्या प्रमाणावर काढणें. दुसरी गोष्ट म्हणजे सरकारी नोकरशाहीच्या कचेऱ्यांमधून अध्यापन करण्याची पात्रता असणाऱ्या नोकरवर्गाची बदली करणें. तिसरा मार्ग म्हणजे बुद्धिमान लोकांसाठीं, सेवानिवृत्त सैनिकांसाठीं आणि श्रेष्ठ व कनिष्ठ श्रेणीच्या माध्यमिक शाळांत उच्च शिक्षणाला आंचवलेले असे जे पदवीधर असतील त्यांच्यासाठीं अल्प मुदतीचे प्रशिक्षणवर्ग उघडणें.

शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे हे जे मार्ग आहेत, त्यांतील पहिल्याची प्रत्यक्ष अशी तपशीलवार योजना अजून प्रसिद्ध झालेली नाहीं. दुसरा तोडगा निराधार आशेसारखा आहे. त्याचे परिणाम मोठेसे होणारच नाहींत. १९५८ मध्यें युंगचुन सियेननें (परगण्यानें) आपल्या ११० वरिष्ठ नोकरांना या कामासाठीं मोकळें केल्याचें सांगण्यांत आलें. पण मोकळिकीची मुदत मात्र नमूद करण्यांत आलेली नाहीं. प्राथमिक शाळांतील शिक्षकांच्या समुदायाची शैक्षणिक पदवी ती कितपत असणार, हें तिसऱ्या तोडग्यावरून दिसतेंच आहे. प्राथमिक शाळांतील शैक्षणिक पातळीहून किंचित् जरी जास्त शिक्षण झालेलें असलें, तरी त्याची प्राथमिक शिक्षक म्हणून भरती केली जाणार ! उलटपक्षीं, ज्याला कम्युनिस्ट प्राथमिक शिक्षण म्हणून संबोधतात त्याचा अभ्यासक्रम ध्यानांत घेण्यासारखा आहे. उत्पादक श्रमांच्या बाबतींत मुलांनीं तज्ज्ञ कसें व्हावयाचें याचें दिग्दर्शन अनुभवी शेतकरी आणि कामगार दाखवू शकतात. पक्षकार्यवाह मुलांसाठीं सांघिक मोहीम संघटित करूं शकतात व मतप्रणालीच्या शिक्षणाचे वर्ग घेऊं शकतात. माध्यमिक शाळांतून बाहेर पडलेले अर्धकच्चे पदवीधर वाचन, लेखन आणि गणित हे विषय हातीं घेऊं शकतात. चीनच्या इतर भागाहून अगदीं उलट गोष्ट पेकिंगची आहे. येथें नॉर्मल कॉलेजांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर आहे, हें या 'प्रदर्शनीय शहरा'स साजेसेंच आहे. पेकिंगमध्यें अशीं वीस कॉलेजें आहेत. नोकरपेशाच्या प्रशिक्षणाचीहि व्यवस्था करण्यांत आलेली आहे. ८० टक्के शिक्षक आपला शैक्षणिक दर्जा वाढावा व वरिष्ठ हुद्द्यावर जातां यावें, म्हणून नभोवाणीद्वारा, तसेंच पत्रव्यवहारानें शाळांमधील खास अभ्यासक्रम पुरा करीत असतात. परंतु प्राथमिक शाळांच्या संदर्भांत जी ' प्रदीर्घ झेप ' घेण्यांत

आली, तशीच ‘ प्रदीर्घ झेप ’ नॉर्मल कॉलेजांच्या बाबतींत घेतली गेल्याचा दावा अद्याप तरी करण्यांत आलेला नाहीं.

१९५७ पासून विद्यार्थ्यांच्या संख्येंत जी अफाट वाढ होत चालली आहे, तीमुळें शिक्षकांचा पुरवठा करण्याचा उद्भवलेला प्रश्न अद्याप पुरेसा हाताळला गेलेला नाहीं; मग तो पूर्णपणें सुटण्याची गोष्टच नको. शैक्षणिक वस्तुस्थिति अशी आहे कीं, पटावरील संख्येचा फुगवटा शैक्षणिक प्रगतीचा निदर्शक म्हणतां येणार नाहीं. उलटपक्षीं शिक्षकांचा तुटवडा मात्र शैक्षणिक दर्जाच्या पीछेहाटीचेंच प्रतीक आहे. इंग्लंड-अमेरिकेंतील या व्यवसायांतील संघटित मताचा रोख असा आहे कीं, गेल्या अर्धशतकांत वर्गांतील विद्यार्थिसंख्येंत जी वाढ होत आहे, ती शिक्षणाचीं उद्दिष्टें साध्य करण्याच्या मार्गातली फार मोठी धोंड आहे. आणि हें मत चुकीचें आहे, हें ठरविण्याच्या दृष्टीनें चीनमध्यें कांहीं निराळें घडलेलें आहे, असें म्हणणें अशक्य आहे. अशा स्थितींत “ तज्ज्ञ लोक अतज्ज्ञांना मार्गदर्शन करतील ” किंवा “ शिक्षकांचा अभाव असूनहि आम्ही उच्च शिक्षणाचीं उत्तम विद्यालयें निर्माण करूं शकतों ” यांसारख्या घोषवाक्यांमागें प्रशिक्षण देऊन शिक्षक तयार करण्यासाठीं जोरदार आणि दीर्घमुदतीचें धोरण आंखणें, अवश्य आहे, ही गोष्ट लपवितां येणार नाहीं. तेव्हां प्रत्येक प्रांताला निःसंशयपणें स्वतःच्या पायावर उभें राहून आपला उद्धार करावा लागेल, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची जबाबदारी माथीं वाहणाऱ्या शिक्षणखात्याला एक तर अमाप पैशाची तसेंच मनुष्यबळ आणि अन्य साधनांबाबत अग्रहक्काची मागणी करावी लागेल किंवा ‘ प्रयोग ’ करून पाहण्यासाठीं प्रत्येक प्रांताला, शहराला आणि कम्यूनला मोठ्या प्रमाणावर उत्तेजन द्यावें लागेल.

१९५९–६० या कालखंडांत तर या गोष्टींचा मागमूसहि आढळत नाहीं. १९५९ अखेरीस **रेड फ्लॅग** या बाबतींत जें काय चांगलें लिहूं शकला, तें इतकेंच :

“ शिक्षकांच्या प्रशिक्षणाच्या समस्येबाबत एका बाजूनें आपण अनुभवी शिक्षकांना अजिबात महत्त्व न देण्याच्या प्रवृत्तीला विरोध केला पाहिजे आणि दुसऱ्या बाजूनें तरुण शिक्षकांना तुच्छ लेखण्याच्या संवयीला आणि नव्या सामर्थ्याकडे कानाडोळा करण्याच्या वृत्तीला विरोध केला पाहिजे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, अनुभवी शिक्षकांना खिजगणतींत न धरण्याची

बाब ही तात्पुरती टिकणारी आहे, पण नवजात सामर्थ्याला आणि ताज्या दमाच्या शिक्षकांना तुच्छ लेखण्याच्या प्रवृत्तीची सतत दखल घेणें अवश्य आहे."

यानंतर सुमारें एक वर्षानें याच वृत्तपत्रांत पक्षाच्या ( Anhwei ) प्रांताच्या समितीच्या कार्यवाहानें लिहिलेला एक प्रदीर्घ लेख प्रसिद्ध झाला होता. त्यांत लेखकानें शाळांसंबंधीं 'सामुदायिक धोरण' आणि विशेषत: १९५८ सालीं घेतलेली 'प्रदीर्घ झेप' यांविषयीं मोठ्या कौतुकानें लिहिलें आहे : परंतु या 'प्रदीर्घ झेपे'ला राजकीय महत्त्वापेक्षां शैक्षणिक महत्त्व कधीं ना कधीं यावें अशी इच्छा असेल तर पुढें काय केलें पाहिजे याविषयीं त्या लेखांत कसलेंच चिन्ह आढळत नाहीं :

"शैक्षणिक कार्याचा फार मोठया प्रमाणावर विकास साधण्यासाठीं फार मोठ्या संख्येनें शिक्षक आणि अधिकारीगट यांची आवश्यकता आहे. शिक्षणाचा फैलाव करण्यासाठीं केलेल्या सामुदायिक मोहिमांतून फार मोठी नवीन कार्यकर्त्यांची फळी उदयास आल्यावांचून राहणार नाहीं. वेगानें वाढत जाणाऱ्या शैक्षणिक कार्याला तोंड देण्यासाठीं आपण पुढें येणाऱ्या या लोकांना सक्रिय उत्तेजन दिलें पाहिजे आणि त्यांच्यांतील लायक माणसांची निवड न कचरतां केली पाहिजे."

या लेखांत आलेली आणखी एकमेव गोष्ट म्हणजे पुढील कबुली :

" Anhwei मधील शैक्षणिक कार्याचा पाया कच्चा आहे. शिक्षकांची वाण तर आहेच शिवाय विकासाच्या पुढील मार्गांत आणखी कांहीं अडचणीहि येतील. कांहीं उजव्या मताचा अधिकारी-वर्ग व शैक्षणिक कार्यकर्त्यांचा वर्ग नेहमीं 'अडचणींच्या परिस्थिती'ची सबब सांगून स्वत:ची कुचराई झांकीत असतो."

उत्पादक श्रमाविषयींचें, मतप्रणालीच्या शिक्षणासंबंधींचें आणि सामुदायिक मोहिमांविषयींचें सर्वसामान्य धोरण व स्थानिक प्रेरणेंतून प्रचंड प्रमाणावर उदयास येणाऱ्या शाळांभोंवतीं माजणारी अटळ बजबजपुरी यामुळें सध्यां रशियामधील पद्धतशीर चाललेल्या शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणापेक्षां चीनमधील प्राथमिक शाळांतून मिळणारें शिक्षण संपूर्णपणें वेगळ्या प्रकारचें आहे. चिनी बालकांना सार्वत्रिक प्रकारचें शिक्षण दिलें जातें, असा दावा करण्यास कम्युनिस्ट दृष्टिकोनच हवा. चिनी बालकांची संघटना

सार्वत्रिक शिक्षणाच्या पायावर उभारली जाते याविषयीं मात्र येथें कसलाच संशय नाहीं. त्सिंघायसारख्या अतिशय अडचणीच्या आणि दूरच्या अल्पसंख्य वस्तीच्या कांहीं प्रदेशांतसुद्धां सार्वत्रिक शिक्षण जारी झालेलें आहे, अशी भाषा बोलण्यास पेकिंगनें आरंभ केलेला आहे. प्रमाणशीर योग्य जागा म्हणजे काय किंवा प्रत्येक वयोमानगटानुसार आंखलेला यथायोग्य अभ्यासक्रम म्हणजे काय, यांसारख्या ज्या समस्या पाश्चात्य देशांना सुपरिचित आहेत, त्या समस्या चीनला अजून तरी भंडावूं लागलेल्या नाहींत. कोणतीहि कचेरी किंवा इमारत– किंवा साधी मोकळी जागा– यांचा शाळा म्हणून उपयोग करण्यांत येतो. उत्पादक श्रम, सामुदायिक मोहिमा आणि पक्षीय युवकसंघटना याच गोष्टी अभ्यासक्रमांतला बराचसा शैक्षणिक भाग व्यापतात आणि मग बालकाला शिकवण्यासारखें उरतें तें फक्त वाचन आणि लेखन. ७ ते १२ वयाच्या जवळजवळ प्रत्येक चिनी बालकाच्या बाबतींत हें असें घडतें. तो संघटित झालेला असतो, तो चांगला कम्युनिस्ट असतो आणि उत्तम कार्यकर्ता असतो. नऊ वर्षांवरील दर पांचांपैकीं चार मुलें **'यंग पायोनियर्स'** (नवे अग्रदूत) या संस्थेंत दाखल झालेलीं असतात. राष्ट्रीय अर्थकारण, राष्ट्रीय अध्यापकनिर्मिति, राष्ट्रीय पातळीवरील इमारती, आणि योग्य तो शैक्षणिक दर्जा, सुप्रतिष्ठित आणि उत्तम वेतनमान असलेला शिक्षणव्यवसाय या गोष्टी अजून बहोत दूरच्या क्षितिजावर दृश्यमान होत आहेत. सध्यां बारा वर्षांच्या सर्व चिनी मुलांच्या मनांवर कायमचे ठसे उमटवण्याचें कार्य सुरू केलें तरी पुरे आहे. प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत चीननें मारलेली मजल ती ही ! आणखी एक गोष्ट म्हणजे चिनी शाळांमधून अद्याप मोफत शिक्षणाची सोय झालेली नाहीं. शिष्यवृत्ति नसलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला आपली फी, पुस्तकें आणि स्टेशनरी यांचा खर्च स्वतःचा स्वतः करावा लागतो. पालक गरीब असल्यास हप्त्यानें पैसे भरतां येतात.

चीनमधील प्राथमिक शिक्षणाला आधुनिक पाश्चात्य शिक्षणमूल्यें बिलकुल लावतां येण्याजोगीं नाहींत. चिनी मुलांच्या दैनंदिन कार्यक्रमांतले कित्येक असे आहेत कीं, त्यांच्यावर, मुलांच्या नोकरीनियंत्रणाचे जे कायदे पाश्चात्य देशांत झालेले आहेत, त्यांनुसार उघडउघड बंदी घालण्यांत आलेली आहे. पण हे कायदे म्हणजे अर्धशतकभर झालेल्या सामाजिक प्रगतीचें फळ होतें. चीन मात्र अल्पावधींत त्यांना मागें टाकण्याचे बेत करीत आहे. चीनच्या विकासाच्या

आजच्या टप्प्यावर चिनी प्राथमिक शाळांचें कार्य एकच आहे. तें म्हणजे देशाच्या कल्याणासाठीं कसल्याहि प्रकारचें काम प्रतिष्ठितपणाचें आहे, या तत्त्वावर विश्वास ठेवणाऱ्या कामगारांच्या राष्ट्राची निर्मिति करणें. फार मोठी शोकांतिका ही आहे कीं, माशा मारणें, कोळशाची ने-आण करणें किंवा पिकांची कापणी करणें यांसारखीं कामें करण्याची स्फूर्ति, इतर देशांचा आणि जीवनमार्गांचा द्वेष शिकविणाऱ्या साधनसामग्रींतून, गीतांतून आणि, प्रदर्शनांतूनच उत्तम प्रकारें मिळते असें कम्युनिस्ट पक्षाचें मत आहे !

✦✦✦

## ८. माध्यमिक शाळा

१९५८ च्या शेवटीं संपूर्ण वेळ शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या १,९५,००० होती. पटावर एकूण १२ दशलक्ष विद्यार्थी असून त्यांपैकीं १०,५२०,००० माध्यमिक शाळांत आणि १७,४०,००० दुय्यम तांत्रिक शाळांत होते. एका वर्षाहून अधिक काळानंतरहि ही संख्या बारा दशलक्षच असल्याचा दावा सांगण्यांत आलेला आहे. अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या दुय्यम शाळांमध्यें प्रचंड प्रमाणावर वाढ झालेली असून या शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दहा दशलक्ष दाखविलेली आहे. १९५८ सालापासून अशा मुलांच्या संख्येंत ९४ टक्के वाढ झाल्याचा दावा करण्यांत आलेला आहे.

✦✦✦

## ९. अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या शाळा

विद्यार्थ्यांच्या संख्येंत ९४ टक्के वाढ कशी झाली, ही माध्यमिक शाळांसंबंधींच्या अलिकडील घडामोडींत मोठी गंमतीची बाब आहे. अर्थात् ही वाढ शिक्षण लोकप्रिय करण्याच्या धोरणाशीं पूर्णपणें सुसंगतच आहे. चीन हें जर कधीं प्रथम श्रेणीचें औद्योगिक शक्तिशाली राष्ट्र व्हावयाचें असेल, तर दुय्यम पातळीवरील शिक्षण घेणारांची संख्या जितकी वाढेल, तितकी हवीच.

अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या माध्यमिक धंदेशिक्षणाच्या शाळांची अधिकाधिक उभारणी करण्यावर जास्तींत जास्त भर दिला पाहिजे, अशा आशयाचें मार्गदर्शक परिपत्रक १९५८ मध्यें निघालें. सोव्हिएट आदर्श समोर ठेवून अशा तऱ्हेचीं बहुलक्ष्यी तांत्रिक विद्यालयें सर्व देशभर निघालीं. कम्यून्सनीं सुद्धां आपापल्या गरजांनुसार अशा तांत्रिक शाळांची उभारणी केली आणि स्थानिक पक्षसमित्या सर्व तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्या योजून झटपट कार्य साधीत होत्या. या नव्या शाळांवर पक्षसमित्यांची पूर्ण हुकमत असून राजकीय अभ्यासक्रम, सामुदायिक कृति आणि उत्पादक श्रम यांसाठीं अवश्य त्या तरतुदी करणें, हें त्यांचें आद्य कर्तव्य मानलें जातें. या शाळांतील वर्गांतून शेतकरी आपलीं तंत्रें शिकवूं शकतो, विद्यापीठांतील प्राध्यापक आपल्या फावल्या वेळांत येऊन वर्ग घेऊं शकतो आणि कॉलेजशिक्षणास आंचवलेला माध्यमिक शाळेचा पदवीधर तिथें येऊन शिकवूं शकतो. शिक्षक आणि साधनसामग्री यांचा अधिक नियमितपणें पुरवठा होऊन गाडें सुरळित चालण्यास कांहीं तरी जालीम सुधारणा होणें अवश्य झालें आहे.

१९५९ सालीं सबंध वर्षभर वृत्तपत्रांमधून जीं प्रकटनें येत होतीं, त्यांवरून अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या दुय्यम शाळांच्या नव्या उभारणीमुळें अधिक पुढचे टप्पे गांठले जात आहेत, याची खूण पटते. या कार्यक्रमाचें सगळ्यांत चित्तवेधक वैशिष्ट्य म्हणजे अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण देणाऱ्या शेतकी शाळांची निर्मिति करून ग्रामीण विभागांतील तरुणांना लगामी लावण्याचा १९५८ पासून चालू असलेला निकराचा प्रयत्न हें होय. १९६० च्या वसंतऋतूपर्यंत अशा प्रकारच्या जवळजवळ २०,००० शाळा आणि २ दशलक्षांहून अधिक विद्यार्थी होते आणि १९६१ सालीं नव्या पद्धतीच्या या माध्यमिक शाळांमधून 'पदवीधरांचें' पहिलें पीक बाहेर पडलें. संपूर्ण वेळ चालणाऱ्या शाळेंतील विद्यार्थ्यांना जो खर्च येई त्या मानानें अगदीं अत्यल्प खर्चांत हें झालें होतें. त्यांची वयोमर्यादा १३–१७ अशी दिलेली असून कांहीं शाळांनीं आठवड्याला अभ्यासाचे वीस तास घेतले जातात, असें नमूद केलें आहे. राजकारण, चिनी भाषा आणि शेतकी ही अभ्यासक्रमाची फलश्रुति असून गणित, पदार्थविज्ञानशास्त्र आणि रसायनशास्त्र या शाखांचा विकास चालू आहे.

ह्या शाळा म्हणजे तरुण मुलांना कम्युनिझमच्या पंखाखालीं आणण्याच्या आणि कम्यून्ससाठीं सेवकवर्ग शिकवून तयार करण्याचा चीनचा जो जिद्दीचा प्रयत्न चालू आहे, त्याच्याच निदर्शक आहेत. यांपैकीं अनेक शाळांचा खर्च कम्यून्स चालवितात आणि कम्यून्समधील नेतृत्व करणाऱ्या व्यक्तीच या शाळांच्या अध्यक्षपदीं असतात. अशा प्रकारच्या नवीन आणि विलक्षण घडामोडी चालू झालेल्या असतांना त्यांतील ज्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर चिनी प्रचारयंत्रणा भर देत असते, त्यांवर मुळांतूनच प्रकाश पाडलेला बरा. ते मुद्दे असे : (अ) पक्षाची कडक हुकमत (आ) कम्यून्सशीं निकटचा संबंध आणि (क) उत्पादनावर भर आणि त्याचाच उपसिद्धान्त म्हणजे स्वावलंबन. पुढील अवतरणांवरून हे मुद्दे स्पष्ट होतात :

(अ) "चिअँगयांग सिएन विभागांत लिचिआंग ही शेतकीची माध्यमिक शाळा स्थापन झाल्याला महिन्याहून अधिक काळ लोटला असेल नसेल, पण तेवढयांत कम्यून्समधील पक्षकार्यवाह व पक्षसमितीच्या प्रचारविभागाचे एक सदस्य प्रतिवृत्त तयार करण्यासाठीं तीनदां येऊन गेले, शालासमितीच्या अनेक सभांना ते हजर राहिले व शाळेचें कार्य सुरळित चालण्यासाठीं त्यांनीं हातभार लावला.... यांगचो शहरामधील शिचिआओ या माध्यमिक शेतकी शाळेची शालासमिति अकरा सदस्यांची असून तींत, कम्यून्सच्या पक्षसमितीचे कार्यवाह, पक्षशाखांचे कार्यवाह, उत्पादकचमूंचे नेते, शाळेचे मुख्याध्यापक, अन्नकचेरीचे प्रमुख, पुरवठा आणि क्रयविक्रय कचेरीचे अध्यक्ष, तसेंच विद्यार्थी आणि पालक यांचे प्रतिनिधि इतक्या लोकांचा समावेश करण्यांत आलेला आहे. या शालासमितीनें शाळाबांधणी, जागा, दूधदुभत्याची सोय आणि विद्यार्थ्यांना लागणारा धान्यपुरवठा यांसारखे प्रश्न परस्परविचारविनिमयानें सोडविले."

(ब) "गेल्या वर्षापासून लिआवोइंग प्रांताच्या विविध भागांत स्थापन झालेल्या ९३० पेक्षां अधिक माध्यमिक शेतकी शाळांना स्थैर्य प्राप्त झालेलें असून त्यांची स्थिति दिवसेंदिवस अधिक सुधारत आहे. माध्यमिक शेतकी शाळांतील नेतृत्वाबाबत पक्षसमित्यांनीं खूपच लक्ष पुरविलें. त्यांनीं हें कार्य पार पाडण्यासाठीं ३८० पेक्षां अधिक अधिकारी-वर्गाची बदली करविली आणि कित्येक पक्षसदस्यांना आणि युवकसंघाच्या सभासदांना या शालायंत्रणेचे आधारस्तंभ बनविलें.... या सहामाहींत निरनिराळ्या ठिकाणच्या

माध्यमिक शेतकी शाळांनीं अध्यापन आणि उत्पादक श्रमदान यांची विभागणी वेळापत्रकांत यथायोग्य रीतीनें केलेली आहे.... उत्पादक श्रमासंबंधीं सांगायचें तर कित्येक शाळांनीं प्रांतांत सर्वत्र आपापले शेतमळे तयार केले असून ४,५३२ माव जमीन त्यांत गुंतलेली आहे. तसेंच त्यांचे १,०१६ कारखानेहि आहेत. विद्यार्थ्यांना उत्पादकचमूंतून सामील होतां यावें, म्हणून कित्येक शाळांनीं जनतेच्या कम्यून्सशीं संबंध जोडलेले आहेत."

(क) "अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षण या योजनेमुळें कित्येक शाळा आणि त्यांतले विद्यार्थी संपूर्णपणें किंवा कांहीं हिस्से तरी स्वावलंबी बनले आहेत. निरनिराळ्या शहरांत आणि परगण्यांत चौकशी केल्यावर असें आढळून आलें आहे कीं, ज्या शाळा स्वतःच्या पायावर उभ्या आहेत किंवा आपल्या विद्यार्थ्यांचा खर्च चालविण्यास समर्थ आहेत अशांची संख्या वीस टक्के आहे तर अंशतः स्वावलंबी असलेल्या शाळांची संख्या तीस टक्के आहे.... किआंग्सूमधील बऱ्याचशा भागांतील माध्यमिक शेतकी शाळेचा अभ्यासक्रम पुढीलप्रमाणें आहे : सर्वसामान्य सांस्कृतिक अभ्यासक्रमांत राजकारण, भाषा, गणित, पदार्थविज्ञानशास्त्र आणि रसायनशास्त्र यांसारख्या रीतसर माध्यमिक शाळांमध्यें शिकवल्या जाणाऱ्या, मूलभूत महत्त्वाच्या विषयांचा अंतर्भाव होतो, आणि तांत्रिक अभ्यासक्रमांत तांत्रिक विषयांचा अंतर्भाव होतो. (उदा. या माध्यमिक शेतकी शाळांत वनस्पतिशास्त्र आणि शेतीबागायतीचीं तंत्रें शिकविलीं जातात). अध्यापन, उत्पादन आणि विश्रांति यांची योजना एकंदरींत समाधानकारक रीत्या केलेली असल्यानें ठरलेल्या वेळेप्रमाणें विषय शिकविले जातात. सर्वसामान्यपणें रीतसर माध्यमिक शाळांमध्यें निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासाचा जो दर्जा असतो, त्याहून या माध्यमिक शेतकी शाळांत कांहीं कमी असतो, असें नाहीं.... एकंदरींत आजकाल माध्यमिक शेतकी शाळांपैकीं बहुतेकांचे छोटे-छोटे कारखाने आहेत. शिवाय कांहींच्या फळबागा, चहामळे, वनराया वगैरेहि आहेत."

अशा रीतीनें चीनच्या ग्रामीण भागांतील माध्यमिक शिक्षण हें उत्पादनाच्या गरजांना जुंपलेलें आहे. प्रत्येक ग्रामीण तरुण 'एकाच वेळीं लिहूं व लढूं शकणारा नव्या मनूचा नवा बुद्धिवंत' बनत चालला आहे. तो 'डोळे वेधून घेणाऱ्या विस्तृत घरांत' शिकत असल्यामुळें तो सतत चिंतन करूं

शकतो कीं, भावी काळांत, एक पूर्ण कम्युनिस्ट म्हणून मी माझ्या जबाबदारीचा वांटा उचलावा, यासाठीं मला तयार केलें जात आहे. चीनला श्रमिकांची गरज आहे आणि चिनी तरुणांना शिक्षणाची गरज आहे. अर्धवेळ काम आणि अर्ध-वेळ शिक्षणाचा हा तोडगा उभयतांची गरज भागवू शकेल. मनस्वी वृत्तीच्या एकनिष्ठ चिनी तरुणाला असलें हें आनंदहीन, कष्टभोगी आणि फलरहित जिणें किती काळपर्यंत पुरेसें वाटेल ? वरकरणी तरी असें दिसतें कीं चीनमध्यें बेशिस्त मुलें किंवा बालगुन्हेगार अजिबात नसावेत, वादविवादाचा तास, निंदानालस्तीची पद्धत आणि पोलादी शिस्त यांच्या बळावर या समस्यांचा निकाल लागतो. सर्व शंकाकुशंकांचें निरसन आणि सर्व आशाआकांक्षांचें निर्मूलन करण्याचें रामबाण साधन म्हणजे मतप्रणालीचें शिक्षण. या साधनाची वाढीव चौकट म्हणून या नव्या शाळा उपयुक्त ठरत आहेत.

✦ ✦ ✦

## १०. शिक्षणाचा दर्जा

परंपरेचा विचार केला तर समाजजीवनाची उच्च पातळी आणि शिक्षणाची उच्च पातळी यांचा किती घनिष्ठ संबंध आहे, हें चिनी श्रोतृसमुदायाला तरी विस्तारानें पटवून देण्याची कमी गरज आहे. आर्थिक तंगीमुळें पक्षाची प्रवृत्ति अशी बनली आहे कीं, शैक्षणिक गोष्टींचा बळी देऊन मतप्रणालीचें शिक्षण आणि शारीरिक श्रम यांवर भर द्यायचा. या धोरणाला मुरड न घातल्यास, एक तर माध्यमिक शिक्षणक्षेत्रासारख्या अत्यंत महत्त्वाच्या क्षेत्रांत अनर्थ ओढवल्यावांचून राहणार नाहीं; शिवाय पक्षाला आपल्या शिक्षणक्षेत्रांतील तज्ज्ञांकडून कोणत्या प्रकारचा सल्ला मिळाला असला पाहिजे, याविषयींहि शंकेला जागा राहणार नाहीं.

एप्रिल १९६० मध्यें भरलेल्या दुसऱ्या नॅशनल पीपल्स कॉंग्रेसच्या अधिवेशनप्रसंगीं शिक्षणमंत्री यांग स्यु फेंग आणि लु तिंग-यि या दोघांनीं उत्पादक श्रमांची वाढती गरज ध्यानांत घेतां (वास्तविक मतप्रणालीच्या शिक्षणासंबंधीं जरी या भाषणांमध्यें सोयिस्करपणें भर दिलेला नसला, तरी

तेंहि बहुधा अभिप्रेत असावें) शिक्षणक्रमांत कोणत्या पद्धतीनें काटछाट करणें शक्य आहे, यासंबंधींचें मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. या दोन प्रमुख वक्त्यांपैकीं कम्युनिस्ट पक्षाच्या मध्यवर्ती समितीच्या प्रचार-विभागाच्या संचालकांपेक्षां शिक्षणमंत्र्यांचें भाषण तपशिलासह समजण्या-जोगें होतें

लु तिंग-यि म्हणाले कीं, " प्राथमिक शाळेंतील सहा वर्षांचा अभ्यासक्रम झाल्यावर मग पुन्हां सहा वर्षांचा माध्यमिक शाळेंतील अभ्यासक्रम पुरा करावयाचा, ही जुनी कल्पना कांहीं प्रदेशांत १९५८ पासूनच दुरुस्त करण्यांत आलेली आहे. " त्यांनीं अशी सूचना केली कीं, " शालेय अभ्यासाचा एकूण कालखंड दहा किंवा नऊ वर्षांचा असावा." आवश्यक त्या शैक्षणिक सुधारणा सुचविण्याच्या बाबतींत लू यांच्यापेक्षां यांग ह्यांचें भाषण अधिक स्पष्ट होतें. माध्यमिक शाळांमधून स्वकीय आणि परकीय देशांचा इतिहास 'सरमिसळ करून' शिकवला जावा, तसेंच, इतिहास-भूगोलाच्या अध्ययना-साठीं 'गतिशील आधुनिकीकरण' (Stream-lining) करण्यांत यावें, असें त्यांनीं सुचविलें.

पाश्चात्य देशांमधून 'विषयामध्यें परस्पर नातें' असलें पाहिजे, अशा कल्पना प्रचलित आहेत. पण असल्या बुरसटलेल्या कल्पनांपेक्षां वेगळ्या कल्पना सदर परिषदेंत मांडल्या गेल्या. मात्र त्या पुष्कळशा मोघम आणि अगम्य स्वरूपाच्या होत्या. हें 'गतिशील आधुनिकीकरण' पुढें प्रांताप्रांतांत कितपत साधलें, हें दर्शवणारे अहवाल ऑक्टोबरांतच पुढें आले. शाळांच्या दैनंदिन कारभारावर हुकमत ठेवणाऱ्या प्रांतिक पक्षसमित्यांनीं आणि पक्षाच्या शाखांनीं लू यांच्या सूचनांचा अन्वयार्थ ज्या विविध पद्धतींनीं लावला, त्यामुळेंहि शैक्षणिक दर्जा कांहीं अंशीं खालावत गेला. उदाहरणार्थ फुकिएन या कम्यूनमध्यें भाषा, राजकारण आणि प्राणिशास्त्र या विषयांची शारी-रिक श्रमांशीं सांगड घालून त्यांचा अभ्यास 'सहकारी पद्धतीनें चालू कर-ण्यांत' आला. शांटुंग मरीन कॉलेजच्या वतीनें चालविण्यांत येणाऱ्या माध्यमिक शाळेंत गणित, पदार्थविज्ञानशास्त्र आणि रसायनशास्त्र यांचा 'एकवळा करून घांस घेण्याचा' प्रयत्न झाला. पेकिंगच्या क्वांगमिंग या दैनिकानें असें प्रसिद्ध केलें कीं, माध्यमिक शाळांमधून पूर्वीं प्रत्येक सहामाहींत

शारीरिक श्रमांसाठीं जेवढा वेळ दिला जात होता, त्यांत वीस टक्क्यांनीं वाढ झालेली आहे. आणि असें असूनसुद्धां उच्च माध्यमिक शाळांचा परंपरागत तीन वर्षांचा अभ्यासक्रम, वाङमयीन आणि शास्त्रीय विषयांत विभागून तो दोन वर्षांवर आणण्यांत यावा, अशी सूचना पुढें मांडलेली होतीच. विद्यार्थ्यांना विशिष्ट विषयांत प्रावीण्य संपादन करण्यास उत्तेजन दिल्यानें सरकारी गरजेप्रमाणें कपात करतां येईल आणि शिक्षणांत 'सुधारणा' होईल, अशीहि अपेक्षा बाळगण्यांत आली होती. हें प्रावीण्यसंपादन विभागणीच्या पुढील भूमिकेनुसार व्हावयाचें होतें: शास्त्राच्या विद्यार्थ्यांना इतिहास-भूगोल हे विषय घेण्यास मनाई करावी, विषयांचे गटच्या गट कटाप करावे आणि 'चीनचा प्राचीन इतिहास' यांसारख्या 'जुन्या पुराण्या' विषयांचा जुजबी परिचय झाला, तरी पुरे, असें धोरण ठेवावें.

तरीसुद्धां एवढ्यांतच शिक्षणक्षेत्रांतील या सुचविल्या गेलेल्या कपातीच्या व सांधेजोडीच्या धोरणाला जादा महत्त्व देणें शहाणपणाचें ठरणार नाहीं. अपेक्षा अशी आहे कीं, आर्थिक परिस्थितींत सुधारणा झाली कीं, शैक्षणिक कार्यक्रमांत कपात करण्याऐवजीं चिनी कम्युनिस्ट सरकार त्यांत वाढच करील. विषयांच्या एकत्रीकरणांतून वेगवेगळ्या विषयांच्या स्वाभाविक अशा अंतर्गत शिस्तीची हानि होते. माध्यमिक शिक्षणाचा लोकप्रिय कार्यक्रम विकसित होण्याच्या दृष्टीनें ह्या उपाययोजना उपयुक्त होत्या, यांत शंका नाहीं. पण सध्यां चीनला माध्यमिक शिक्षणक्षेत्रांत जी गुणवत्ता अत्यावश्यक झालेली आहे, तिला मात्र या उपाययोजना विरोधी ठरत आहेत. सोव्हिएट युनियन आपला अभ्यासक्रम वाढवून अकरा वर्षांचा करण्यांत गर्क आहे. आर्थिक शक्यता निर्माण झाली कीं, चीनहि त्याच्याच पावलावर पाऊल टाकील, यांत संशय नाहीं. लू किंवा यांग यांपैकीं कोणीहि शैक्षणिक क्षेत्रांतील सुधारणा झटपट उरकावी, असें सुचविलेलें नाहीं. आर्थिक दृष्ट्या तंगीच्या काळामध्यें राजकारणी लोकांना विशेष आकर्षक वाटतील, अशा शैक्षणिक सुधारणा घडवून आणण्यासाठीं दहापासून वीस वर्षांपर्यंतचा अनुभव गांठीं असणें अवश्य आहे, असें त्या दोघांनीं विलक्षण अजीजीनें प्रतिपादलें.

✦ ✦ ✦

## ११. उच्च शिक्षण

१९५८ सालअखेर उच्च शिक्षणाच्या ५,४८३ संस्था असून विद्यार्थ्यांची पटावरील संख्या १.१४ दशलक्ष होती. एका वर्षानंतर या संस्थांची संख्या १.०१ दशलक्षांवर दाखविण्यांत आली होती आणि त्यांत पूर्ण-वेळच्या, अर्ध-वेळच्या आणि फावल्या वेळच्या संस्थांचा अंतर्भाव आहे, हेंहि स्पष्ट करण्यांत आलेलें होतें. पूर्ण-वेळ शिक्षण घेणारांची संख्या ६,६०,००० इतकी होती. जानेवारी १९६० मध्यें ही संख्या ८,१०,००० अशी दाखविण्यांत आली होती. हेतु हा कीं, दुसऱ्या पंचवार्षिक योजनेनुसार १९६२ सालासाठीं जो ८,५०,००० हा आंकडा ठरविण्यांत आला होता, त्या आंकड्याशीं ती संख्या जवळ जाणारी वाटावी.

तेव्हां १९५८ सालच्या 'पुढें घेतलेल्या प्रदीर्घ झेपें'त पूर्ण वेळ उच्च शिक्षण घेणारांची संख्या पन्नास टक्क्यांनीं वाढली. १९५९ मध्यें तींत झालेली वाढ त्या मानानें कमी असली, तरी लक्षणीय म्हटली पाहिजे. आज चीनमध्यें ८४० विद्यापीठें आहेत व त्यांपैकीं २४ बहुलक्ष्यी स्वरूपाचीं आहेत. पेकिंग विद्यापीठ, पेकिंगचें जनता-विद्यापीठ, नांकायचें ताइंत्सिन विद्यापीठ, शांघायचीं फुतान आणि तुंगचि हीं विद्यापीठें, तसेंच चेकिआंग, वुहान, झेच्युआन, लांचौ हीं विद्यापीठें नामांकित मानलीं जातात.

विद्यापीठांखेरीज देशामध्यें तांत्रिक महाविद्यालयांचें जाळेंच पसरलेलें आहे. उद्दिष्टाच्या दृष्टीनें या संस्था एकाच युक्तिसंगत पातळीवर आलेल्या असल्या तरी उच्च श्रेणीचें शिक्षणकार्य साधण्याच्या दृष्टीनें त्यांच्या कुवतींत मात्र विलक्षण तफावत पडत असली पाहिजे. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचीं ३३ तर वैद्यकीय शिक्षण देणारीं ३० कॉलेजें आहेत. विणकाम, जलसंचयविद्या, दळणवळणविद्या आणि उड्डाणविद्या यांपासून तों अल्पसंख्यांकांचें राजकारण, राज्यविषयक संख्याशास्त्र यांसारख्या कम्युनिस्टांच्या सुप्रसिद्ध तंत्रांपर्यंत विविध शिक्षण देणारीं इतरहि कॉलेजें आहेत. 'प्रदीर्घ झेपे'चा एक मोठा परिणाम असा झाला कीं, राष्ट्रांतील अल्पसंख्य वस्त्यांच्या कानाकोपऱ्यांपर्यंत उच्च शिक्षणाचें लोण फैलावत गेलें.

✦✦✦

# १२. विद्यापीठविषयक सरकारी धोरण

दशकाहून अधिक काळपर्यंत कम्युनिस्ट हुकमतीखालीं असलेल्या या विद्यापीठांचें आजचें चित्र कसें काय आहे? दरम्यानच्या काळांत पाश्चात्य मार्गदर्शनाची पदच्युति आणि रशियन मार्गदर्शनाची स्वीकृति झालेली आहे, उद्योगप्रधान राष्ट्राच्या गरजा भागविण्यासाठीं विद्यापीठांच्या स्वरूपांत कायापालट झालेला आहे. १९५२–५३ आणि १९५५–५६ या सालीं खात्यांचें दोनदां स्थलांतर घडून आलेलें आहे आणि १९५७ सालीं पक्षांतर्गत शुद्धीकरणाची लाट येऊन गेलेली आहे. मग कम्यून्स आणि कारखाने यांनीं सुरू केलेल्या या शेंकडों 'विद्यापीठां'चा अर्थ काय? सर्वसामान्यतः दत्त म्हणून पुढें उभ्या राहणाऱ्या गंभीर शैक्षणिक समस्यांना हीं विद्यापीठें तोंड देत असल्याचीं कांहीं चिन्हें दिसतात का? दिसत असल्यास कशीं आणि कोठें दिसतात?

उच्च शिक्षण देणाऱ्या सुप्रतिष्ठित आणि प्रमुख संस्थांचे अभ्यासक्रम आणि प्रवेशविषयक अटी यांचा खुलासा करणारी वृत्तपत्रीय प्रसिद्धीपत्रकांची एक मालिकाच १९५९ सालच्या मार्च ते जुलै महिन्यांच्या दरम्यान प्रसिद्ध झाली होती. तिच्यावरून आणि प्रसिद्ध झालेल्या इतर वृत्तांतांवरून हें उघड होतें कीं, गेल्या दशकांत सरकारपुढें उभ्या ठाकणाऱ्या उच्च शिक्षणक्षेत्रांतील जटिल समस्या दोन आहेत :

(१) चिनी जनतेच्या मतपरिवर्तनासाठीं उच्च शिक्षणाचा उपयोग कसा करतां येईल? अंतिम साध्य या दृष्टीनें उच्च शिक्षणांतून संपूर्ण कम्युनिस्ट मानव निर्माण झाला पाहिजे, उच्च शिक्षणाची गोडी आम जनतेला लागून त्याचा प्रसार झाला पाहिजे, तसेंच या शिक्षणसंस्थांचीं दारें केवळ कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनाच खुलीं असलीं पाहिजेत; बाकीच्या अत्यावश्यक असलेल्या पण राजकीय दृष्ट्या अविश्वसनीय आणि हट्टाग्रही बुद्धिवादी मंडळींना छुपीं आश्रयस्थानें म्हणून सहजासहजीं त्यांचा उपयोग होतां कामा नये आणि अशा रीतीनें उच्च शिक्षण हें पक्षोद्दिष्टें साधण्यासाठीं पूर्णपणें राबवितां आलें पाहिजे, हा या सर्वांमागील हेतु होता.

(२) उच्च शिक्षण राष्ट्राच्या पुनर्घटनेच्या लगामीं कसें लावतां येईल ? सर्वांत प्रमुख गोष्ट ही कीं, आधुनिक उद्योगप्रधान राष्ट्राच्या गरजा भागविण्यासाठीं तंत्रज्ञांची आणि विज्ञान आणि तांत्रिक विद्या हस्तगत केलेल्या अधिकारीवर्गाची पैदास मोठ्या प्रमाणावर झाली पाहिजे. आज ना उद्यां चीनला स्वतःच्या पायावर उभें राहण्याचें सामर्थ्य आलें पाहिजे, रशियन छंदानुवर्तित्वांतून आपण मुक्त झालों आहोंत, असें वाटलें पाहिजे; तसेंच पाश्चात्य जगतांतील उच्च शिक्षण घेऊन तयार झालेल्या चिनी शास्त्रज्ञांना अलभ्य प्रलोभनें दाखवून आकर्षित करण्याच्या आपल्या खटपटी-लटपटींचा चीनला स्वतःला वीट येईल, अशी चीनची तयारी झाली पाहिजे.

वास्तविक पाश्चात्य शिक्षणतज्ज्ञाला हे दोन हेतु परस्परविरोधी वाटतील; पण चिनी सरकारच्या दृष्टीनें राजकीय परिवर्तन व तांत्रिक आणि बौद्धिक प्रगति यांचा अगदीं जिव्हाळ्याचा संबंध आहे.

वरवर पाहतां १९५९ सालीं पक्षाची विजयमार्गाची वाटचाल पूर्ण झाली होती. कोठें विरोध असलाच, तरी तो आजमितीस मूक झालेला आहे. संशयास्पद वाटणाऱ्या प्राध्यापकाची उत्पादक श्रमासाठीं तत्काळ देशाच्या कोनाकोपऱ्यांत उचलबांगडी झालीच म्हणून समजावी. नोकरी मिळणें सुलभ झालेलें असल्यामुळें उच्च शिक्षणासाठीं विद्यापीठांत जाणें खरोखर आवश्यक आहे काय, या विषयावर कांहीं माध्यमिक शाळांचे पदवीधर वादविवाद करूं लागले असले, तर त्यांत आश्चर्य वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. पदवी मिळाली कीं, विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याला अक्षरशः रंगरूटभरतीला तोंड द्यावें लागतें. देशाच्या कानाकोपऱ्यांत व अविकसित प्रदेशांत नोकरी मिळविण्यासाठीं पदवीधर विद्यार्थीवर्गांत अगदीं अहमहमिका लागलेली आहे, असें जें ठांसून सांगितलें जातें, तें चिनी कम्युनिस्ट प्रचारतंत्राचें संशयास्पद वाटणारें ठळक वैशिष्ट्य आहे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांतील या झपाट्याच्या वाढीतून पदवीधर हा राष्ट्राचा आधारस्तंभ म्हणून पुढें येण्याऐवजीं तो आपल्या विद्यापीठावर हुकमत गाजविणाऱ्या स्थानिक पक्षाच्या आदेशाचा गुलाम होत चालला आहे. "प्रायः परीक्षेंत उत्तीर्ण होण्याला कोणीच चुकत नाहीं." या चक्रांतून कोणालाहि सुटका नाहीं. पेकिंगमध्यें मोठ्या हुद्द्याची जागा मिळवायची असेल, तर याहून सोपा किंवा नजीकचा मार्ग नाहीं.

चीनच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेंत (१९५३–५८) उच्च शिक्षणावर सर्व भर देऊनसुद्धां, तसेंच अग्रहक्क कशाला द्यायचा, याविषयीं सर्वतोपरी साह्य करण्यासाठीं उच्च शिक्षणासाठीं स्वतंत्र मंत्रालय असूनसुद्धां पक्षानें केलेल्या प्रयत्नांचें पदरांत पडलेलें फलित अत्यल्प आहे. १९५७ सालीं "शंभर फुलें फुलत" असतांना पक्षाचा आत्मविश्वासच डळमळला. इतर कम्युनिस्ट जगतांत असंतोषाचा उद्रेक प्रथम उठला होता तो विद्यापीठीय विद्यार्थीवर्गांतच. चीनमध्यें हेंच घडलें. कम्युनिस्ट समाजरचनेंतील संपूर्ण नवमानवाच्या निर्मितींत विद्यापीठांना जें अपयश आलें, त्याचे गर्भित राजकीय परिणाम इतके गंभीर होते कीं त्याची कल्पनाच करवत नाहीं. यावर तोडगा हा काढलाच पाहिजे. पक्षीय हुकमत पूर्णपणें गाजविण्यांत यावी, हाच यावर उपाय म्हणून सांगितला गेला.

✦ ✦ ✦

## १३. नव्या संपूर्ण कम्युनिस्ट मानवाची जडणघडण

---

**१९५९-६०** हा कालखंड असा होता कीं, ज्यांत चिनी विद्यापीठें आणि कॉलेजें यांवर पक्षाची सर्वंकष पकड अगदीं घट्ट बसलेली होती. या काळांत शिक्षणविषयक जीं जीं वृत्तपत्रीय प्रसिद्धिपत्रकें निघालीं, त्यांतून राजकीय प्रचारकाचा सूरच उठून दिसत होता. पक्षाची मध्यवर्ती समिति स्थानिक पक्षशाखेमार्फत आपला दृष्टिकोन व्यक्त करीत असे आणि अशा रीतीनें पक्षाच्या आणि 'मार्गदर्शक' गटाच्या हातीं उच्च शिक्षणाचीं सर्व सूत्रें एकवटलीं होतीं. उच्च शिक्षणखातें आधींच बरखास्त झालेलें होतें. त्यामुळें विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यावर वरचष्मा गाजविणारे पक्षप्रतिनिधि अभ्यासक्रमाची आंखणी स्थानिक गरजेनुसार त्या त्या कॉलेजापुरती स्वतंत्रपणें करीत. अभ्यासक्रमावरील पक्षाच्या वर्चस्वाचा व्यावहारिक आविष्कार अपेक्षेप्रमाणेंच पुढीलप्रमाणें घडून आला :

(१) मतप्रणालीविषयक अभ्यासक्रमाची पुनर्रचना आणि दृढीकरण करण्याचा प्रयत्न करणें.

(२) उत्पादनाशीं, विशेषत: शारीरिक श्रमांशीं सर्व प्रकारच्या शिक्षणाची सांगड घालण्याचा प्रयत्न करणें.

(३) शास्त्रीय संशोधनकार्याची सामुदायिक प्रमाणावर प्रगति घडवून आणणें.

ज्या घटनांचा पक्षाला मोठा अभिमान वाटतो, त्यांचें दर्शन वृत्तपत्रांत सहजासहजीं होतें. विद्यालयांतील अभ्यासक्रम पक्षाच्या हेतुपूर्तीच्या लगामीं फार मोठ्या प्रमाणावर लावण्याचीच ही कहाणी आहे. कांहीं प्रमुख विद्यापीठांत घडून आलेल्या घटना पुढीलप्रमाणें आहेत :

(१) "**पेकिंग** विद्यापीठां"त सध्यां ९००० पेक्षां अधिक विद्यार्थी आहेत.... विद्यापीठांत १,३०० शिक्षक, सोव्हिएट युनियन आणि अन्य देशांतले एकूण २३ परकीय तज्ज्ञ आणि २७ देशांतले २०० हून अधिक परकीय विद्यार्थी आहेत. शैक्षणिक योजनेंत उत्पादक श्रमांचाहि अंतर्भाव करण्यांत आलेला आहे.... शास्त्र, परभाषा, आणि वाङ्मय या विषयांच्या विद्यार्थ्यांना दर वर्षीं दोन महिने किंवा थोडा अधिक काळ श्रमांच्या कामाला द्यावा लागतो; आणि कलाविषयक निरनिराळ्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना प्रतिवर्षीं सरासरी ३ महिने श्रमाच्या कार्यासाठीं द्यावे लागतात... शिवाय पक्षानें घालून दिलेली सामुदायिक कक्षा विद्यापीठ कडक रीतीनें अंमलांत आणतें आणि शास्त्रीय संशोधन कार्यासाठीं विस्तृत सामुदायिक प्रयत्नांवर भर देतें.

(२) "**जनता विद्यापीठां**"त सध्यां रीतसर कॉलेजचा अभ्यासक्रम घेतलेले, संशोधनकार्य हातीं घेतलेले आणि खास अभ्यासक्रम पुरा करणारे असे एकूण ७,००० हून अधिक विद्यार्थी आहेत आणि पत्रव्यवहारद्वारा अभ्यासक्रम पुरा करणारे ७,२०० हून अधिक विद्यार्थी आहेत. विद्यापीठांतील अध्यापक, कार्यकर्ते आणि अन्य नोकरवर्ग यांची संख्या २,००० हून अधिक आहे... श्रमजीवी वर्गाच्या राजकारणासाठीं शिक्षण उपयोगी पडलें पाहिजे आणि त्याची उत्पादनाशीं सांगड घातली गेली पाहिजे, या पक्षीय मार्गदर्शनाची अंमलबजावणी जारीनें झाल्यामुळें 'जनता विद्यापीठा'च्या स्वरूपांत महदंतर पडलेलें आहे. अध्यापन, उत्पादकश्रम आणि शास्त्रीय संशोधन यांच्यांत चांगला घट्ट मेळ घातला गेला असल्यामुळें अध्यापनाचा दर्जाहि खूपच उंचावला आहे.... पायाभूत अशा राजनैतिक मतप्रणालींचा

पद्धतशीर अभ्यास हा केंद्रबिंदु आहे .... दर आठवडचाला सामान्यतः बारा तास अभ्यासाप्रीत्यर्थ खर्च केले जातात."

जनता विद्यापीठांतील अध्यापनविभागाला आपल्या सांप्रदायिक मत-प्रणालीच्या अभ्यासक्रमाच्या स्वरूपांत बदल करावा लागला. या घडामोडी पाश्चात्य निरीक्षकाला पोकळ भपक्याच्या वाटतील; पण चिनी कम्युनिस्ट विद्यापीठामध्यें त्यांना अतिशय पवित्र आणि अर्थपूर्ण असें स्थान आहे :

"इतिहास-विभागानें चीनमधील क्रांतीच्या इतिहासावरील व्याख्यानांमध्यें योग्य ती दुरुस्ती घडवून आणली.... या सहामाहींत मार्क्सवाद–लेनिनवादाच्या मूलभूत तत्त्वांच्या विभागानें 'साम्यवाद आणि समाजसत्तावाद' या नवीन विषयाचा अभ्यासक्रम सुरू केला आहे.... तत्त्वज्ञान-विभागानें आपल्या शिक्षणक्रमांत कॉम्रेड माऊ त्सेतुंग यांच्या तात्त्विक विचार-सरणीचा नेमस्त प्रमाणांत अंतर्भाव केला आहे आणि तीन ग्रंथ तयार केले आहेत.... अर्थशास्त्रविभागानें एक व्याख्यानमालिका तयार केली आहे.... तिच्यामध्यें सी. सी. पी. (चिनी कम्युनिस्ट पार्टी)च्या मध्यवर्ती समितीच्या कागदपत्रांवर आणि माओ त्सेतुंग यांच्या ग्रंथावर विशेष भर देण्यांत येत असतो."

पेकिंग विद्यापीठानें जें प्रमाण दर्शविलें आहे, त्या प्रमाणांत उत्पादक श्रम पूर्ण केले जातात. शास्त्रीय संशोधनकार्याविषयीं पुढील अहवाल देण्यांत आलेला आहे :

"वर्षभरांत ६,४०० पेक्षां अधिक शास्त्रीय संशोधनपर ग्रंथ लिहिले गेले. मागच्या आठ वर्षांच्या तुलनेनें ही वाढ ६·४ पटीहून अधिक होती. शास्त्रीय संशोधनकार्य यापुढें मूठभर लोक करीत नसून तें सामुदायिक रीत्या केलें जात असतें. ९० टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांनीं व शिक्षकांनीं शास्त्रीय संशोधनाच्या कार्यांत भाग घेतला. विद्यापीठांनीं विविध प्रकारच्या १,००० हून अधिक चर्चा आयोजित केल्या.... जनतेच्या कम्यून्सच्या विश्वात्मक प्रतिष्ठापनेंतून उद्भवणाऱ्या तात्त्विक आणि व्यावहारिक समस्यांचा सार्वत्रिक प्रमाणावर अभ्यास झाला."

दोन ते तीन महिनेपर्यंत उत्पादक श्रम; आठवडचाचे बारा तास विशिष्ट मतप्रणालीचा अभ्यास, पक्षाचा कारभार, कम्युनिस्ट युवकसंघ, सामुदायिक चळवळी आणि आत्मपरीक्षणासाठीं घेतलेल्या अगणित सभा या साऱ्यांचा

विचार केला कीं, चिनी विद्यापीठांतून काय शिक्षण दिलें जातें आणि तेथील शिक्षक आणि विद्यार्थी यांचें जीवन कसें व्यतीत होत असतें, त्याची कल्पना करतां येते. खर्च भरून काढणें, उत्पादनांत वाढ करणें, श्रमिक आणि बुद्धि-मान वर्ग यांतील अंतर भरून काढणें या गोष्टींना उत्पादक श्रमाच्या कार्य-क्रमांचें साहाय्य होतें. मतप्रणालीच्या अभ्यासक्रमाला विद्यापीठांत स्वतंत्र विभागाच्या पातळीवर नेऊन पोहोंचविल्यामुळें तरुणांच्या मनांत अवश्य ते विचार भरतां येतात. कारखान्यांतील किंवा ग्रामीण भागांतील कम्यून्समधील मुदत संपतांच तरुण विद्यार्थ्यानें जनतेशीं कितपत संपर्क साधला आहे, याची परीक्षा घेण्यांत येते. बौद्धिक कसोटीच्या दृष्टीनें विद्यापीठांतील शिक्षणक्रम आव्हान देणारा नसला, तरी तो चांगलाच कष्टाचा असतो. पहिल्या पांच वर्षांच्या अभ्यासक्रमांत विद्यार्थ्याला स्वतःसाठीं फावला वेळ असा अजिबात मिळत नाहीं. आणि त्याच्या सहा आठवड्यांच्या वार्षिक सुटींत त्याला एखाद्या शेतमळ्यावर किंवा न्यायालयांत ( Banch ) किंवा पूरव्याप्त नदीकिनाऱ्या-वर कामगिरीसाठीं बोलावणें आलें नाहीं, तर तो नशिबवान म्हटला पाहिजे.

आतां ज्या कालखंडाचें समीक्षण केलें जात आहे, त्यांत विद्यापीठावर पक्षाचें नियंत्रण लादणें आणि त्यांतून कट्टर कम्युनिस्ट-नीति निर्माण करणें या गोष्टींनाच चिनी सरकारनें सर्वश्रेष्ठ महत्त्व दिलेलें आहे, हें उघड आहे.

✦ ✦ ✦

## १४. उच्च शिक्षणाची लोकप्रियता वाढविण्यामागील हेतु

---

पक्षाच्या शैक्षणिक 'मार्गदर्शना'च्या आणखी एका अंगाविषयीं खुलासा करणें अवश्य आहे. उच्च शिक्षणाचें लोण जनसामान्यापर्यंत लोकप्रिय करून पोंचविणें, या वाक्प्रचाराच्या शब्दशः अर्थामध्यें फार मोठ्या परिणामांचीं बीजें सांठविलेलीं आहेत. या बाबतींत नेमकी आंकडेवारी इतक्यांतच देणें अकालीं ठरण्यासारखें आहे. शिवाय प्रत्येक प्रदेशांतलें चित्र वेगवेगळ्या स्वरूपांत रंगवलें गेलेलें आहे :

"गतवर्षीच्या 'प्रदीर्घ झेपे'च्या काळांत क्वांग-तुंगमध्यें उच्च शिक्षणाच्या छत्तीस संस्था स्थापन करण्यांत आल्या.... निरनिराळचा प्रांतांतील सीसीपी जिल्हा समित्यांनीं आपापल्या प्रदेशांत नव्यानें स्थापन झालेल्या शाळांच्या कारभाराकडे काळजीपूर्वक लक्ष दिलें. नव्या शाळांचें नेतृत्व करण्यासाठीं कित्येक जिल्हा समित्यांनीं आपापले सभासद, दुय्यम कार्यवाह आणि विभाग-प्रमुख यांनाहि दिमतीला दिलें. नव्यानें स्थापन झालेल्या या शाळांवरील आपल्या नेतृत्वाची पकड मजबूत करण्यासाठीं कित्येक जिल्हा समित्यांनीं उच्च शिक्षण संस्थांमधून 'नेतृत्वगटां'ची किंवा 'पक्षसमित्यां'ची स्थापना केली आहे.

शिवाय १९६० सालाच्या मध्यास आपल्याकडील उच्च शिक्षण संस्थांपैकीं निम्म्याहून अधिक संस्था गेल्या दोन वर्षांत स्थापन झालेल्या आहेत, असें किआंग्सू प्रांतानें जाहीर केलें आहे. चीनच्या इतर प्रांतांतील घडामोडींचा विचार केल्यास किआंग्सू प्रांतानें जाहीर केलेली गोष्ट अप्रातिनिधिक आहे असें म्हणतां येणार नाहीं.

सध्यां, कसली तरी एक चौकट असली नि ती] पक्षाच्या अभिरुचीला मानवणारी असली, म्हणजे पुरे आहे. अर्थात् ही चौकट सध्यां अगदीं प्राथमिक स्वरूपाची असूं शकेल. १९६० सालीं लु तिंग-यि यांनीं जेव्हां ६९ विद्यार्थी असलेल्या शान्सीच्या पिंग-याओ-हिसीन् विद्यापीठाला भेट दिली तेव्हां तेथील तीन गोष्टींची गैरहजेरी मोठचा अभिमानानें जाहीर करण्यांत आली : प्राध्यापकांची गैरहजेरी, वरिष्ठ माध्यमिक शाळांच्या पदवीधरांची गैरहजेरी आणि साधनसामग्रीची गैरहजेरी. अर्थात् 'विद्यापीठां'च्या प्रयत्नांचा विशेष भर सध्यां तरी माध्यमिक शाळांच्या कार्यावरच आहे. अन्य शेंकडों विद्यापीठांहून सुप्रतिष्ठित झालेलें कियांगसी प्रांतांतील 'कम्युनिस्ट श्रमिक विद्यापीठ' अर्ध-वेळ काम आणि अर्ध-वेळ अभ्यास असणारें विद्यापीठ आहे. यांत रीतसर चार वर्षांचा अभ्यासक्रम आहेच. शिवाय या विद्यापीठाच्या श्रमिक तंत्रविद्यालयांमध्यें दोन वर्षांचा अभ्यासक्रमहि ठेवण्यांत आलेला आहे. शेतकरी-कामकऱ्यांचें सतरावें वर्ष उलटलें असलें आणि त्यांना राजकारण, भाषा आणि अंकगणित यांचें 'सामान्य ज्ञान' झालें कीं बस होतें. बुद्धिमान् तरुणांसाठीं गृहीत धरलेली ज्ञानाची पातळीहि कनिष्ठ माध्यमिक शाळेची आहे. पावसाळचांतील छत्र्यांप्रमाणें उगवलेल्या या 'विद्यापीठां'चें शैक्षणिक

परिणामांच्या दृष्टीनें विशिष्ट महत्त्व प्रस्थापित होण्यास अद्याप कित्येक वर्षें लोटावीं लागतील. पाश्चात्य धर्तीच्या विद्यापीठांतून रीतसर तयार होऊन पुढें आलेल्या विद्यार्थ्यांच्या पिढीच्या तुलनेनें या विद्यार्थ्यांच्या भवितव्याला वाव कमी आहे, हें खरें; पण पाश्चात्य विद्यापीठांतील वहिःशाल विभागांनीं ज्या जातीची उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी बजावली आहे, तशा स्वरूपाच्या शैक्षणिक कार्यक्षेत्रांत मात्र त्यांना उज्ज्वल भवितव्य आहे. राजकीय उपयुक्ततेचा विचार बाजूला सारून त्यांच्या शैक्षणिक विकासाचा विचार करावयाचा असेल तर त्याची गुरुकिल्ली एकाच गोष्टींत शोधली पाहिजे. ती गोष्ट म्हणजे चांगल्या प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमध्यें तयार झालेला कार्यक्षम शिक्षकवर्ग उपलब्ध होणें.

१९५९-६० हा काळ राजकीय वर्चस्वाकडे प्रामुख्यानें लक्ष देणारा असला, तरीसुद्धां उच्च श्रेणीच्या अध्ययन-अध्यापनाच्या महत्त्वाच्या गरजा भागविण्याबाबत पूर्णपणें दुर्लक्ष करण्यांत आलेलें नव्हतें. १९५९ च्या ऑगस्टमध्यें पेकिंगमध्यें 'चिनी वैद्यकीय महाविद्यालया'ची झालेली स्थापना या बाबतींत खास उल्लेखनीय म्हटली पाहिजे. या महाविद्यालयाचा शिक्षणक्रम अष्टवार्षिक असून कडक प्रवेशपरीक्षा दिल्यानंतरच त्यांत प्रवेश मिळतो :

"वैद्यकीय शास्त्रांच्या अकादमीच्या नियंत्रणाखालीं चालणाऱ्या संशोधन संस्थांमधील व रुग्णालयांतील अनेक वरिष्ठ संशोधक हे या नव्या वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यापकवर्गांत असतील, तसेंच त्यांत पूर्वीच्या 'चायनीज् युनियन मेडिकल कॉलेज'च्या प्राध्यापकांचाहि अंतर्भाव केलेला असेल."

याच काळांत जुन्या एंजिनियरिंग कॉलेजच्या पायावर वाङ्मय, विज्ञान आणि एंजिनियरिंग या विषयांचे अभ्यासक्रम देणारें नवें संयुक्त विद्यापीठ उभें राहून त्यांतून हुनान विद्यापीठाचा विकास झाला :

"उच्च प्रशिक्षणाचे खास अभ्यासक्रमहि सिद्ध करण्यांत आले आहेत. त्यांचा प्रमुख हेतु, शास्त्रज्ञ आणि संशोधक तयार करणें आणि उच्च शिक्षण संस्थांना व माध्यमिक विद्यालयांना लायक अध्यापकवर्ग पुरविणें हा आहे. एंजिनियरिंग कॉलेजांसाठीं आंखलेल्या अभ्यासक्रमांचा प्रमुख हेतु औद्योगिक उपक्रमांसाठीं वरिष्ठ अधिकारीवर्ग पुरविणें हा आहे."

✦ ✦ ✦

## १५. ‘ क्रांती ’च्या मार्गावर ?

चिनी उच्च शिक्षणक्षेत्राच्या सद्य:स्थितींत त्याच्याकडून ज्ञानमार्गावरील भरीव कार्य किंवा पुढच्या मजला मारणारी खास प्रगति यांसारखी नेत्रदीपक कामगिरी आज तरी अपेक्षितां येणार नाहीं. विद्यापीठें आणि कॉलेजसारख्या संस्था यांवर हुकमत असणाऱ्या प्रमुखांच्या डोक्यांत पक्षीय वाक्प्रचारांची इतकी खिचडी भरून राहिलेली आहे कीं, त्यांत शैक्षणिक कल्पनांना फारसा वाव नाहींच. याचे संभवनीय निष्कर्ष तीन : पहिला असा कीं, चिनी उच्च शिक्षणाच्या नेहमींच्या मुशींतून विद्वत्ता आणि व्यावसायिक नेतृत्व यांचा एकरस होऊन यदाकदाचित् माणसाची जडणघडण झालीच, तर तो माणूस एकाच वेळीं विद्वान् आणि कामकरी असेल; तो हातीं लेखणी घेण्याबरोबरच कामकऱ्याचा पोषाखहि अंगावर चढवील. दुसरा निष्कर्ष असा कीं, पक्षानें आपल्या बहुविध गरजांनुसार आंखणी करून घेतल्यावर अभ्यासक्रमाचा जो भाग उरतो, त्याच्या वेळापत्रकांतील अध्ययनाचा बराचसा वेळ कार्यकारी तंत्रज्ञ तयार करण्यांत खर्च होत असतो. एकूण विद्यार्थ्यांपैकीं फार मोठी संख्या ‘ शास्त्रज्ञां ’ची आहे. त्यांनीं उत्साहानें कार्य करावें आणि रोजच्या वापरांतील वस्तूंचें उत्पादन करावें, अशी अपेक्षा केली जाते. प्रतिष्ठित विद्यापीठांतून किंवा कॉलेजांमधून होणारें उत्पादनकार्य शिकाऊ उमेदवाराच्या किंवा उच्च श्रेणीच्या तज्ज्ञाच्या तोडीचें असतें; तर भूछत्रांसारख्या उपऱ्या शिक्षण संस्थांतून होणारें काम चीनच्या गरजा भागविणारें आगि नवशिक्या पातळीवरचें असतें. तिसरी गोष्ट अशी कीं, सोव्हिएट रशिया आणि त्याच्या उपग्रहासारखीं असलेलीं इतर राष्ट्रें यांच्या बाबतींतली स्वत:ची पराधीनता संपविण्याची चीननें जर का एखादी योजना आंखलेली असेल, तर त्या योजनेचें प्रतिबिंब, चीनमध्यें आजवर विकसित झालेल्या उच्च शिक्षणपद्धतींत फारसें पडलेलें नाहीं. बरेच चिनी उच्च शिक्षणासाठीं रशियाकडेच जातील. कारण चीनमध्यें उपलब्ध असलेल्या शैक्षणिक सोयी अगदीं अपुऱ्या आणि हीन प्रतीच्या आहेत. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांत नव्या सर्वंकष क्रांतीचीं पदचिन्हें दिसूं लागलीं आहेत. चीनच्या औद्योगीकरणाच्या कार्यक्रमाची स्वाधीनता गंभीरपणें विचारांत घेण्यापूर्वीच उच्च तंत्रविद्येच्या क्षेत्रांत नवा मनु सुरू होणार आहे.

✦ ✦ ✦

# १६. प्रौढांसाठीं फावल्या वेळचें शिक्षण

१९५८ च्या नोव्हेंबरमध्यें फावल्या वेळीं शिक्षण देणाऱ्या शाळांच्या हजेरीपटावर ६० दशलक्ष विद्यार्थी होते, ही संख्या १९५० सालच्या मानानें १० दशलक्षांनीं कमी होती. वर्षभरांत ही संख्या १०० दशलक्ष झाल्याचा दावा मांडण्यांत आलेला आहे. १९६० च्या उन्हाळयांत हा दावा १२० दशलक्षांपर्यंत गेला. यांपैकीं सुमारें ५० दशलक्ष शेतकरी साक्षरताप्रसार वर्गांतले होते.

१९५९–१९६१ या कालखंडांत शिक्षण अधिकाधिक लोकप्रिय करणें हें सरकारी प्रमुख धोरण होतें. त्या काळांतली प्रसिद्ध करण्यांत आलेली संख्या प्रचारासाठीं फुगविण्यांत आलेली होती. असें असलें तरी मोठ्या प्रमाणावर शीघ्रसुधारणा घडवून आणण्याचें चिनी लोकांचें सामर्थ्य फावल्या वेळच्या शिक्षणक्षेत्राइतकें दुसऱ्या कोणत्याहि क्षेत्रांत फलदायी झालेलें दिसत नाहीं; आणि म्हणून प्रचारी आंकड्यांच्या मागील वस्तुस्थिति खरी कशी आहे, हें पाहणें अगत्याचें ठरतें. या काळांत प्रसिद्ध झालेल्या आंकड्यांवरून महत्त्वाचें अनुमान निघतें तें हें कीं, स्थानिक पक्षसंघटनांच्या सहकार्यानें शिक्षण लोकप्रिय करण्याचें आपलें सामर्थ्य कम्यून्सनीं घसघशीतपणें सिद्ध करून दाखविलें आहे.

अद्यापहि हिंवाळा हा खडतर कष्टाचा जात असला, 'उत्पादनाला अग्रक्रम आणि अभ्यासाबाबतची हमी' या तत्त्वावर भरविल्या जाणाऱ्या वर्गांतील उपस्थितीला भोजनाच्या किंवा विश्रांतीच्या वेळेंतील उपस्थितीहून कमी किंमत दिली जात असली, तरी एकंदरींत प्रगतीच्या दृष्टीनें बराच पल्ला गांठलेला आहे आणि देशांतील कित्येक प्रांत, आपल्या भागांत श्रमिकांच्या फावल्या वेळच्या शाळांचें पद्धतशीर जाळें पसरलेलें आहे, अशी बढाई मारतांना दिसून येतात. आपले ८७ टक्के कामगार फावल्या वेळच्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांतून शिक्षण घेत असतात, असा पेकिंगचा दावा आहे. शांघायमध्यें अशा ३००० शाळा आहेत; त्यांपैकीं कांहीं माध्यमिकोत्तर दर्जाच्या असून पुष्कळशा कामगारांसाठीं आहेत. स्वायत्त प्रदेशांत फावल्या वेळच्या शाळा हें सामर्थ्यशाली कम्युनिस्ट हत्यार आहे. ल्हासामध्यें

अशा ४२ शाळा असून त्सिंगायच्या ग्रामीण भागांत २०,००० मेंढपाळ फावल्या वेळच्या शाळेंत शिकत असतात.

कम्युनिस्टांच्या प्रचारतंत्रानुसार प्रसंगोपात्त या फावल्या वेळच्या शाळांचीं वर्णनें केलीं जातात; त्यावरून अशा शाळांची शैक्षणिक फलश्रुति चालू काळांत कितपत पदरांत पडते, याविषयीं तात्पुरते निष्कर्ष काढतां येतात. १९५९ च्या मार्चमध्यें पेकिंग येथें कारखाने आणि खाणी यांतील कामगारांच्या शिक्षणाच्या विचारार्थ एक राष्ट्रीय परिषद भरविण्यांत आली होती. आणि तिनें केलेल्या सूचना एका वर्षानंतर अंमलांतहि आल्या होत्या. या बाबतींत आलेल्या अडचणींची दखल खुल्या दिलानें घेण्यांत आलेली होती.

"सर्वसाधारणपणें बोलायचें तर योजना आंखण्याचा आपला अनुभव अजून तोकडा पडतो; कांहीं महत्त्वाच्या समस्यांबाबत तर काळजीपूर्वक आणि पुनःपुन्हा अभ्यास होणें अगत्याचें आहे.... शाळांत दाखल झालेल्या कामगारांची शेंकडेवारी आणि प्रत्यक्ष उपस्थितांची टक्केवारी स्पष्टपणें मांडली जात नाहीं किंवा अगदींच कमी दर्शविली जाते.... समोर ठेवलेलें उद्दिष्ट पुरेसें व्यवहार्य पातळीवरील नाहीं."

खाणी किंवा कारखाने यांतील ५० किंवा ६० टक्के कामगार जरी शाळांतून दाखल झाले, तरी ती संख्या देखील अगदीं असमाधानकारक आहे, असें मानण्यांत येत नाहीं आणि यांतले निम्मे लोकच काय ते माध्यमिक पातळीपर्यंत पोहोंचूं शकतात :

"सामान्यतः कारखाने आणि खाणी यांतील फक्त अल्पसंख्य कामगारच (प्रामुख्यानें तरुणवर्ग) उच्च शिक्षण घेऊं शकतो.... कांहीं विभागांत माध्यमिक शाळांच्या पदवीपर्यंत गेलेल्यांची बहुसंख्या आढळते तर कांहीं विभागांत त्यांची अल्पसंख्याच आढळते. प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम पूर्ण करून माध्यमिक शिक्षण घेणारांची वा अन्य कांहीं पूरक अभ्यासक्रम पुरा करणारांचीच एकंदरींत बहुसंख्या आहे."

शैक्षणिक क्षेत्रांत उत्साहानें कार्य करण्याच्या बाबतींत हरबिन मीट प्रोसेसिंग प्लँट मागें नाहीं; आणि त्याची प्रसिद्धीहि बराच काळपर्यंत चालू आहे. या कारखान्याचें फावल्या वेळचें विद्यापीठ असून प्राथमिक आणि माध्यमिक

शाळाहि आहेत. कधीं कधीं कार्यक्षमतेची योग्य पातळी गांठण्यासाठीं आठवड्याला सहा ते आठ तास मात्र शैक्षणिक वर्गांना दिले जातात; साक्षरताप्रसाराच्या वर्गांना अधिक वेळ दिला जात असण्याची शक्यता आहे. असें नमूद केलें गेलें आहे कीं, :

" पंचवीस टक्के कामगारांनीं शाळेंत शिक्षण घेतलें, पण त्यांच्या शिकण्याचें उद्दिष्ट स्पष्ट नव्हतें. कांहींनीं " बढती मिळविण्यासाठीं तंत्रविद्येचा अभ्यास " चालविला होता, तर इतरांनीं " आपला दर्जा वाढविण्यासाठीं शिक्षणक्रम " अंगीकारला होता. परिणामीं त्यांच्या हजेरीचें प्रमाण फारसें वरचें नव्हतें आणि विविध सबबींवर कांहीं लोक गैरहजरच राहात. पांच टक्के कामगारवर्गानें शिक्षणवर्गांत भागच घेतला नाहीं. . . . . अर्धवेळ काम करणाऱ्या शिक्षकांना सामुदायिकरीत्या पाठांची तयारी करून घेण्यासाठीं दर आठवड्याला दोन तास मिळतात आणि वैयक्तिक तयारीसाठीं पुरेसा वेळ मिळतो. "

चिनी प्रौढांना राजकीय मतप्रणालीचे डोसावर डोस पाजण्याची दुसरी नामी युक्ति, या दृष्टिकोनांतून फावल्या वेळच्या शाळांकडे पाहिलें गेलें नसतें, तर त्यांची झाली तितकी आश्चर्यकारक प्रगति होणें कठिण गेलें असतें, हें आवर्जून स्पष्ट करण्याची आवश्यकता नाहीं. तसेंच शैक्षणिक क्षेत्रांतील शीघ्रसुधारणांचा अवलंब फार मोठ्या प्रमाणावर केल्यानें शिक्षणाच्या सर्व पातळ्यांवर ज्या काळीं पक्षाचा क्रियाशील हस्तक्षेप डोळ्यांत भरण्याइतका चालू होता, अशा काळांत याहून फार मोठा पल्ला अपेक्षित होता. कित्येक 'शाळा' तर अक्षरशः क्षणभंगुर ठरल्या आहेत. ज्ञानाच्या बाबतींतली उणीव शिक्षकांनीं आपल्या उत्साहानें भरून काढावी, असें मानलें जातें. अध्ययन आणि अध्यापन हातांत हात घालून जातात, हाच दृष्टिकोन सदैव बाळगण्यांत येतो. भूछत्रांप्रमाणें उगवलेल्या वर्गांना शिकविण्यास उपयोगी पडतील, असे शिक्षक तयार करण्यासाठीं चिनी कम्युनिस्टांनीं अल्पमुदतीच्या सर्व तऱ्हेच्या युक्त्याप्रयुक्त्या योजिल्या आहेत. अलिकडील प्रगति कायम राखायची असेल तर फावल्या वेळच्या शाळांचे शिक्षक तयार करण्यासाठीं शिक्षकांच्या 'नमुनेदार शाळा' (normal schools) काढणें, ही पुढची अपरिहार्य पायरी आहे. १९५९ सालीं ३०० भावी शिक्षकांसाठीं अशा प्रकारची शाळा उघडण्यांत आली. नभोवाणी, ध्वनिमुद्रिका, चित्रपट, टेलिव्हिजन या साधनांच्या द्वारा

शैक्षणिक समस्येला उत्तर देण्याची उमेद बाळगलेली आहे. पेकिंग, शांघाय, कंतान, हरबिन आणि शेन्यांग या शहरांतून १९६० सालीं 'टेलिव्हिजन विद्यापीठें' स्थापन करण्यांत आलेलीं आहेत. सुरवातीस 'पेकिंग विद्यापीठ' आणि 'पेकिंग टीचर्स कॉलेज' या संस्थांमधून गणित, पदार्थविज्ञानशास्त्र आणि रसायनशास्त्र या विषयांना आठवडयाला चार तास देण्यांत येतात आणि आणखी चार तास घरच्या अभ्यासाची जोड देऊन विद्यार्थी अभ्यास भरून काढतात.

चीनची ही फावल्या वेळची शिक्षणपद्धति कितपत परिणामकारक झालेली आहे याची खरी कसोटी भविष्यकाळांतच लागणार आहे, असा निष्कर्ष यांतून अनिवार्यपणेंच निघतो. प्रचारतंत्रानें जे अनागोंदी आंकडे प्रसिद्ध केलेले आहेत त्यांमध्यें या क्षेत्रांतील अंगभूत सावळ्यागोंधळाचें चांगलेंच प्रतिबिंब पडलेलें आहे. फावल्या वेळची शिक्षणपद्धति अद्याप झपाट्यानें विकसित होत आहे, हें खरें; तरीपण हा सर्व विकास जरूर त्या इमारती, साधनसामग्री आर्थिक अंदाजपत्रक किंवा शिक्षक यांच्याखेरीजच चाललेला आहे. अशा स्थितींत साक्षरताप्रसार वर्ग, राजकीय तत्त्वप्रचार आणि थोड्याफार प्रमाणांत प्राथमिक शिक्षण हीं कशींबशीं तग धरून राहतील आणि या पातळी-वर कदाचित् प्रत्येक जण प्रत्येकाला कांहीं ना कांहीं शिकवूं शकेल. तरीसुद्धां साक्षरतेचा आणि प्राथमिक शिक्षणाचा फैलाव ही अत्यंत निकडीची गरज आहे व आमजनतेंत राजकीय मतप्रचार करण्यासाठीं वाहिलेल्या इतर खूपच संस्था विद्यमान आहेत. औद्योगीकरणाच्या प्रक्रियेचें एक प्रमुख साधनीभूत हत्यार म्हणून फावल्या वेळचें शिक्षण चीनला महत्त्वाचें वाटत असेल, – नि येत्या दशकांत तेंच महत्त्वाचें कार्य राहणार आहे – तर विद्या-र्थ्यांच्या समजशक्तीला झेंपतील, अशा उच्च तंत्रविद्येच्या अभ्यासक्रमांवर आपलें सामर्थ्य केंद्रित केलें पाहिजे. फावल्या वेळच्या शिक्षणक्षेत्रांतहि माध्य-मिक, तांत्रिक आणि शक्य तर उच्च पातळीवरील शिक्षणक्रमांचा अंतर्भाव केला जाणें अत्यंत महत्त्वाचें आहे, याची जाणीव झाल्याचीं कित्येक चिन्हें सध्यां दिसूं लागलीं आहेत. 'रेडफ्लॅग' पत्रांतील लेख हे नेहमींच काळाचीं पावलें दाखविणारे असतात. या पत्रांतील लेखांमधून तंत्रविद्येच्या प्रसाराच्या दृष्टीनें फावल्या वेळच्या शिक्षणाचें खरें कार्य कोणतें, यावर विशेष भर देण्यास प्रारंभ झालेला आहे. आपल्या फावल्या वेळच्या शिक्षणक्रमामधून

७५६२१ दि: निबंध
२०९६ नों. दि. २०।३।६९


१९६८ पर्यंत ७००,००० तांत्रिक अधिकारीवर्ग तयार करण्यासाठीं निष्ठेनें कार्य करण्याचा आपला बेत जाहीर केला आहे. आपल्या फावल्या वेळच्या कॉलेजांमधून प्रथमच ४० पदवीधर मेकॅनिकल एंजिनियर्स तयार झाल्याचें समाधान चुंकिंगनें व्यक्त केलेलें आहे. फावल्या वेळच्या शिक्षणा-संबंधीं जी एक राष्ट्रीय परिषद १९६० च्या जुलैमध्यें ताएत्सिन् येथें भरली होती, तींत नोंद करण्यांत आली, ती अशी :

"गेल्या वर्षअखेर फावल्या वेळच्या विद्यापीठांत शिकणाऱ्या कामगारांची जी संख्या होती, तिच्या मानानें आतांची संख्या दीडपट झालेली आहे. कांहीं प्रांतांत, कारखान्यांत आणि खाणधंद्यांत पूर्ण वेळ विद्यापीठेंहि स्थापन झालेलीं आहेत."

फावल्या वेळच्या शिक्षणसंस्थांसाठीं आवश्यक असलेल्या लायक अनुभवी शिक्षकांची प्रचंड फौज उभी होईपर्यंत विद्यापीठें आणि कॉलेजें, प्रशाला आणि तांत्रिक विद्यालयें आणि कुशल तंत्रज्ञ असणारे कारखाने या सर्वांचें सहकार्य एकवटून अधिक पद्धतशीरपणें अध्यापनाची गुणवत्ता वाढेल, याकडे लक्ष दिलें पाहिजे. सर्व देशांतील फावल्या वेळच्या शिक्षणकार्यांत मार्गदर्शन करण्यासाठीं सी. सी. पी. च्या मध्यवर्ती समितीनें 'स्टेट कौन्सिल' चें अंग म्हणून 'स्पेअर टाइम एज्युकेशन कमिटी' १९६० च्या जानेवारींत स्थापन केली. अनागोंदी आणि अवाढव्य अशा संघटनेवरील राजकीय हुकमत निष्कंटक करणें, हें तिचें राजकीय उद्दिष्ट होतें, तर आधुनिक औद्योगिक आणि कृषिप्रधान अर्थकारणासाठीं फावल्या वेळांतील शिक्षण संस्थांमधून कुशल कारागिरांचा नियमित आणि खात्रीचा पुरवठा करणें, हें तिचें शैक्षणिक उद्दिष्ट होतें.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
वा. क्र. ७४३८६

## १७. परदेशस्थ चिनी विद्यार्थी

**१९६०** सालीं सिंगापुराहून प्रसिद्ध झालेल्या परदेशस्थांविषयींच्या खात्याच्या अहवालावरून असें दिसून येतें कीं, शिक्षणक्षेत्रांत नशिब काढण्यासाठीं चीनला परत येणाऱ्या परदेशस्थ चिनी विद्यार्थ्यांच्या संख्येंत भयंकर घट होत चालली आहे. १९५७ सालीं सिंगापुराहून चीनला गेलेल्यांची संख्या ८९३ होती,

१९५८ मध्यें ती २१२ वर गेली, तर १९५९ सालीं ती १५२ वर घसरली. आग्नेय आशियामध्यें वस्ती करून राहिलेल्या चिनी समाजांत चीनची पत उतरत चालली आहे, असें अनुमान या सिंगापुरी आंकडेवारीवरून काढणें धाष्टर्याचें ठरेल. पण परदेशस्थ चिनी लोक हे चीनची हालहवाल कशी काय आहे, या गोष्टींत रस घेणारे आणि त्याविषयीं अचूक निदान करणारे म्हणून गणले जातात.

चिनी कम्युनिस्ट सरकारशीं अनुकूल संबंध प्रस्थापित करून चीनच्या भवितव्यांत स्वतःला सहभागी करून घ्यावयाचें असेल, तर परदेशस्थ चिनी कुटुंबांना विविध मार्ग मोकळे आहेत. पहिला मार्ग म्हणजे देणग्या किंवा पैसे पाठविणें. दुसरा मार्ग म्हणजे आपल्यांतील तरुण लोक शिक्षणासाठीं मायदेशीं पाठविणें. कांहीं प्रसंगीं घडलें, त्याप्रमाणें जर का एखादा तरुण आपल्या पालकांच्या खप्पामर्जीची पर्वा न करतां चीनमध्यें आला, तर ती गोष्ट त्यांच्या चीननिष्ठेचा घवघवीत पुरावाच म्हटली पाहिजे. चीनमधील प्रत्येक परदेशस्थ विद्यार्थ्यानें केव्हां तरी देशांतर करण्याचा वैयक्तिक निर्णय घेतलेलाच असतो, तेव्हां परदेशस्थ चिनी समाजांतील जे विद्यार्थी चीनमध्यें आलेले असतात त्यांच्या संख्येवर प्रकाश टाकणाऱ्या आंकडेवारीला अंगभूत असें महत्त्व आहे.

परदेशस्थ विद्यार्थ्यांविषयींचें चीनचें धोरण आणि इतरत्र अवलंबिलें जाणारें धोरण यांत कांहीं ठळक भेद आहेत. उदाहरणार्थ, इंग्लंडचें सरकार आपल्या परदेशस्थ विद्यार्थ्यांचें यथायोग्य स्वागत करून त्यांची सोय लावण्याबाबत साहजिकच तत्पर असतें. ब्रिटिश शिक्षण संस्थासुद्धां उमेदवाराला शैक्षणिक मार्गदर्शन करण्याबाबत अतोनात परिश्रम घेतात. त्यामुळें शैक्षणिक दृष्ट्या अपात्र आणि आर्थिक दृष्ट्या निराधार अशा विद्यार्थ्यांबाबत जो अपव्यय होतो किंवा त्याची शोकांतिका होते, तशी पाळी तेथें येत नाहीं. पण जे कोणी चीनमध्यें यायची तसदी घेतील, त्यांना कम्युनिस्ट मगरमिठी मारायची, हा चीनचा खाक्या आहे. चीनमध्यें परदेशस्थ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो आणि अत्यंत क्षुद्र वेतनाची हमी देण्यांत येते. ताईत्सिन विद्यापीठांत महिन्याला १४ यॉन पाठ्यवेतन दिलें जातें आणि त्यांतून १२ यॉन खाण्याराहण्याचा खर्च म्हणून कापले जातात. चीनमध्यें येणाऱ्या परदेशस्थ विद्यार्थ्यानें स्वतःच्या समाजाकडून आर्थिक मदत घेतली नाहीं, तर पादत्राणें

किंवा कपडे बदलणें हेंहि त्याच्या खिशाला परवडणार नाहीं; मग चैनीचे चोजले पुरविण्याची गोष्ट दूरच. परंतु आर्थिक वा शैक्षणिक कफल्लकपणा किंवा काळजीपूर्वक आणि तारतम्ययुक्त मार्गदर्शनाचा अभाव असूनहि परदेशस्थ विद्यार्थ्यांचें चीनविषयक आकर्षण कमी झालें नव्हतें. १९५७ पर्यंत चीनचा एतद्विषयक कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडलेला होता. येऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश देण्याच्या आपल्या धोरणाला पुरें पडतां यावें, म्हणून कंतॉन, पेकिंग आणि स्वॅटौ या ठिकाणीं परदेशस्थ विद्यार्थ्यांसाठीं पूरक शाळा ( Supplemental Schools ) उघडण्यांत आल्या. उच्च शैक्षणिक संस्थांकडून जी ज्ञानाची यत्ता अपेक्षित असते, तेथवर या परदेशस्थ विद्यार्थ्याला आणून सोडावयाचें, हें या शाळांचें उद्दिष्ट होतें. १९५० सालापासून बंद असलेलें चायनान विद्यापीठ १९५८ सालीं केवळ परदेशस्थ विद्यार्थ्यांची गरज भागविण्यासाठीं पुनश्च सुरू करण्यांत आलें. फुकियेनीज परदेशस्थ विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठीं श्री. के. के. तान या मलायन चिनी लक्षाधीशानें १९२२ सालीं अमॉय विद्यापीठ स्थापन केलें पण 'स्वातंत्र्यो'त्तर काळांत श्री. के. के. तान यांच्या पावलावर पाऊल टाकून त्यांच्या तऱ्हेचा ठळक असा प्रयत्न कोणीच केलेला आढळून येत नाहीं.

१९५७ सालापासूनची परदेशस्थ विद्यार्थ्यांची हकीगत फारशी अप्रतिहत यशस्वीपणाची नाहीं. त्यामुळें एखाद्या विशिष्ट संदर्भांत परदेशस्थ चिनी लोकांची संख्या किती आहे, याची नेमकी माहिती कम्युनिस्ट साधनांवरून मिळणें कसें कठिण आहे, याचा उलगडा होतो.

१९५७ सालीं ओव्हरसीज् चायनीज् एफेअर्स कमिशनच्या प्रमुखानें नॅशनल पीपल्स कॉंग्रेसपुढें निवेदन केलें कीं, चीनमध्यें शिक्षणक्षेत्रांतील सर्व पातळयांवरील ४०,००० परदेशस्थ विद्यार्थी आहेत. हा आंकडा अशक्य कोटींतला नसला तरी त्या काळच्या मानानें अवाच्या सव्वा वाटतो आणि त्यानंतरच्या एतत्संबंधींच्या परिस्थितीमुळें तर हा दावा अगदीं अडचणींत टाकणारा वाटतो. सिंगापूरप्रमाणेंच हॉंगकॉंगमधून चीनमध्यें येणाऱ्या चिनी विद्यार्थ्यांच्या संख्येंत १९५७ सालापासून सतत घट होत चालली आहे, हें सरकारी माहितीवरूनहि दिसून येतें आणि ही गोष्ट अगदीं नेमका नव्हे,

तरी जो गोळावेरीज आंकडा चीनमध्यें प्रसिद्ध झालेला आहे, त्यावरून पटण्यासारखी आहे.

१७ डिसेंबर १९६० रोजीं ओव्हरसीज् चायनीज् अफेअर्स कमिशनचे उपाध्यक्ष श्री. फँग फँग यांनीं कंतॉनहून असें जाहीर केलें होतें कीं, गेल्या वर्षभरांत '१०,००० हून अधिक' परदेशस्थ चिनी विद्यार्थी चीनमध्यें आले. आतां १९५७ सालीं दावा केलेला ४०,००० हा आंकडा आणि प्रस्तुत आंकडा यांतील घसरगुंडी खरोखर फार मोठी आहे.

यांतून एक गोष्ट उघड दिसते कीं, जेव्हां परिस्थिति स्वतःला अनुकूल असते, तेव्हांच चीन तपशीलवार आंकडेवारी प्रसिद्ध करतें. प्रत्येक राष्ट्राच्या परदेशस्थ खात्याकडून याचा पडताळा घेतां येण्यासारखा आहे.

परदेशस्थ समाजांच्या चीनमध्यें येऊन विद्यार्जन करण्याच्या उत्साहाला ओहोटी लागण्याचीं कारणें कांहीं अंशीं कल्पनेनेंच ताडण्याजोगीं असलीं, तरी त्यांचा शोध घेण्यास फारसे आयास करायला नकोत. चीनमधील खडतर भौतिक जीवनमान, जगजाहीर असलेली अन्नटंचाई, विद्यार्जनासाठीं आलेल्या विद्यार्थ्यांपुढें वाढून ठेवलेले शारीरिक काबाडकष्ट यांमुळें चीनचे कट्टर चाहतेसुद्धां या बाबतींत भलावण करतांना विचारांत पडतात. कालौघाबरोबर हेंहि उघड झालेलें आहे कीं, शिक्षण संपतांच परदेशस्थ चिनी विद्यार्थ्यांची रवानगी पुनश्च त्यांच्या समाजांत करावयाची, हाच चीनचा खराखुरा दृष्टिकोन आहे. अनेक चिनी माजी विद्यार्थी मायदेशीं नोकरी शोधण्यासाठीं सिंगापूर, हाँगकाँग आणि इतर ठिकाणीं परत आलेले आहेत. अधिकृत शैक्षणिक पदवीचा अभाव आणि कांहीं भागांतली त्यांच्याविषयींची संशयित दृष्टि अशा विविध प्रकारच्या कारणांमुळें त्यांना मनाजोगत्या नोकऱ्या सहजासहजीं मिळणें कठिण जातें. ज्या काल्पनिक सुवर्णभूमीच्या शोधार्थ मोठ्या आत्मविश्वासानें आणि श्रद्धेनें तुम्ही तीनचार वर्षांपूर्वी निघून गेलांत, ती सोडण्याची पाळी तुमच्यावर कां आली, ह्या प्रश्नानें त्यांची मित्रमंडळीहि त्यांना भंडावून सोडते. परदेशस्थ चिनी समाजांतील विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यासाठीं उभारलेली यंत्रणा अजूनहि कार्यक्षम असली, तरी तिच्यांत मूळचा जोम राहिलेला नाहीं. चीनमधील शिक्षणावर पक्षीय हुकमत जबरदस्त असल्यामुळें तेथें मिळणाऱ्या कम्युनिस्टी पद्धतीच्या

शिक्षणाचा उपयोग आपल्या हेतुपूर्तीसाठीं होईलच असा भरंवसा चिनी परदेशस्थ विद्यार्थ्याला वाटेनासा झाला.

शिवाय, गेल्या पांच वर्षांच्या काळांत प्रमुख परदेशस्थ चिनी समाजांत माध्यमिक आणि उच्च पातळीवरच्या शिक्षणाचा विकास चिनी भाषेच्या द्वारा झालेला दिसून येईल. विशेषतः सिंगापूरला झालेला नान्यांग विद्यापीठाचा उदय, माध्यमिक अभ्यासक्रमोत्तर उच्च महाविद्यालयांची हाँगकाँग येथें झालेली वाढ आणि तेथें एक चिनी विद्यापीठ उभारण्याची संकल्पित योजना यांमुळें परदेशस्थ चिनी तरुणांना आपल्याच समाजामध्यें राहून शिक्षण घेण्याची संधि अधिकाधिक प्रमाणावर मिळण्याचा संभव निर्माण झालेला आहे. शिवाय तैवान येथील प्रतिस्पर्धी विद्यापीठ, अमेरिकेंतील अनेक कॉलेजांचें आणि विद्यापीठांचें उदार धोरण आणि ब्रिटिश राष्ट्रकुलांतील विविध देशांमधून उपलब्ध असलेल्या उच्च शिक्षणाच्या सोयी, यामुळें परदेशस्थ चिनी समाजांतून वाढत्या प्रमाणावर पुढें येणाऱ्या लायक आणि महत्त्वाकांक्षी तरुणांना अधिकाधिक वाव मिळत आहे.

✦ ✦ ✦

# १८. साक्षरताप्रसार आणि ध्वनिदर्शक (Phonetic) वर्णमाला

**१९५०** सालीं कम्युनिस्ट सरकारनें असा दावा मांडला कीं, ३ ते ५ वर्षांच्या कालखंडांत झाडून सर्व सुसंघटित कामगारांना लिहितां वाचतां येईल. हा दावा जरी अपुरा राहिला असला, तरी याबाबत खूप लांबचा पल्ला गांठला गेलेला आहे. या प्रगतीची गुरुकिल्ली शोधायची झाल्यास ती, कामगारांची शिकण्याची इच्छा आणि पक्षाच्या आदेशानुसार कार्यवाहींत आलेल्या शीघ्रसुधारणा यांमध्यें शोधतां येईल. साक्षरताप्रसार वर्गासाठीं लागणारीं अभ्यासाचीं साधनें आतां विपुल प्रमाणावर उपलब्ध झालीं आहेत. तीं सर्व आशयाच्या दृष्टीनें पाहतां राजकीय प्रचारात्मकच असतात हें खरें; तरीसुद्धां १५०० मुळाक्षरांवर (शेतकऱ्यांना) किंवा २००० मुळाक्षरांवर (इतर कामगारवर्गाला) त्वरित प्रभुत्व मिळवतां यावें, या दृष्टीनें साधनांची आंखणी करण्यांत आलेली आहे.

रस्त्यांत वा दुकानांत, खाणींत वा कारखान्यांत, भातशेतांत वा स्वयंपाक घरांत साक्षरताप्रसाराचा वर्ग भरलेला आहे आणि एखादा लहान मुलगा-एखाद्या वयोवृद्ध माणसाला शिकवीत आहे, हें पुष्कळदां आढळणारें दृश्य म्हणजे चिनी कम्युनिस्टांच्या शिक्षणविषयक प्रयत्नांचें एक वैशिष्टयपूर्ण प्रतीक म्हणतां येईल. कारण अक्षरशत्रू माणूस साक्षर माणसाच्या मानानें आपल्या सरकारचा कर्तबगार नोकर म्हणून कामगिरी कधींच बजावूं शकणार नाहीं.

परकीय निरीक्षकाच्या चष्म्यांतून सद्यःकालीन चिनी शिक्षणपद्धतीचा ठळक विशेष म्हणजे रोमन किंवा ध्वनिदर्शक मुळाक्षरांचा केलेला सार्वत्रिक स्वीकार. चिनी कम्युनिस्टांचें असें म्हणणें आहे कीं, चिनी मुळाक्षरांचा अभ्यास ही शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या मार्गांतली कायमची धोंड आहे. हजारों अक्षरांचीं वळणें आत्मसात् करण्याची यातायात, कुंचल्याच्या लेखन-पटुत्वासाठीं खर्चावीं लागणारीं अनेक वर्षें आणि अक्षरांच्या उच्चारपद्धतींत पडणारें महदंतर यांमुळें चिनी लोक शिक्षणक्षेत्रांत मागें पडत आलेले आहेत. १९५१ सालीं प्रथमच कम्युनिस्टांनीं मुळाक्षरांचें सुलभीकरण कसें करावें आणि तीं सुकर रीतीनें कशीं शिकवावीं यासंबंधीं मार्गदर्शन करण्यासाठीं एक समिति नेमली. १९५६ सालापासून ही सुलभ वर्णमाला, पेकिंग येथील अधिकृत उच्चारांसह, शिकविली जाऊं लागली. शिवाय कांहीं अल्पसंख्य राष्ट्रकांमध्यें रोमन लिपींत लिहिलेली देशी भाषा रुळविण्याचा नवा प्रयोग करण्यास सरकारनें प्रारंभ केला. रोमन लिपीच्या वापराविषयींचें अनुभवाचें जें संचित या अल्पसंख्य जमातीपाशीं गोळा झालेलें आहे, त्याकडे परकीय निरीक्षकांचें जावें तसें लक्ष गेलेलें बिलकुल दिसत नाहीं. खरोखर या अल्प-संख्य जमाती चीनच्या एकूण लोकसंख्येच्या मानानें ६ टक्के भरतील, एवढचा आहेत. १९५० सालाच्या सुरुवातीस सगळयांत अगोदर 'यि' या जमातीनें आपल्या भाषेचें रोमनीकरण केलें. हा उपक्रम पुढेंहि चालू ठेवण्यांत आला. 'सिक्यांग' मधील 'उइघुर' आणि 'कझाख' या भाषांचें रोमनीकरण झाल्याचें अगदीं अलिकडेच घोषित करण्यांत आलें आहे. साक्षरतावर्गांतून चिनी भाषेसाठीं रोमन लिपी योजण्याचा प्रयोग मोठ्या प्रमाणावर करून सीसीपीच्या मध्यवर्ती समितीनें, कम्यून्सनीं शिक्षणक्षेत्रांत जें उत्साहाचें वारें निर्माण केलें होतें, त्याचा फायदा घेण्याचा बेत केला असल्यास त्यांत आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं.

ही प्रक्रिया पुढें दिल्याप्रमाणें घडून येत असे :

" प्रत्यक्ष पायऱ्या पुढीलप्रमाणें होत्या : ध्वन्यादर्श वर्णमालेवर प्रभुत्व मिळविणें, नंतर चिनी शब्दांच्या लेखनाची पद्धति आत्मसात् करणें, 'शेतकऱ्यांची त्र्यक्षरी वाचनपाठमाला' यांसारखीं लोकप्रिय आणि सुगम पुस्तकें प्रथम वाचावयास शिकणें, आधीं शब्दभांडार आणि मग वाक्यें-आणि तदनंतर किस्से गिरवणें, पाठांतर करणें आणि नंतर निबंधलेखन. दोन महिन्यांच्या प्रयत्नांनंतर हा कम्यून संपूर्णपणें निरक्षरतेचें उच्चाटण झालेला असा साक्षर कम्यून बनला. "

रोमन वर्णमाला स्वीकारण्याचे अंतिम हेतु व परिणाम यांविषयीं इतक्या घाईनें अंदाज बांधणें चुकीचें होईल. चिनी सरकारचा आजवरचा प्रचारहि सावधपणेंच चाललेला आहे :

" चिनी मुळाक्षरांची ओळख करून घेण्यास मदत व्हावी, हाच यांत आमचा हेतु आहे. चिनी वर्णमालेऐवजीं ध्वनिदर्शक वर्णमाला प्रचलित करावयाची असा आमचा हेतु कधींच नव्हता. "

उलट भाषिक धोरणाला भावनात्मक स्फोटक वळण फटदिशीं लागतें, या बाबतींतलें शंकानिरसन लगोलग झालेंच पाहिजे. तसेंच पुरेसा अनुभव गांठीं बांधायचा असेल, तर त्याला बराच कालहि लोटावा लागेल, या सर्व गोष्टींची सरकारला नीट जाणीव आहे. ध्वनिदर्शक वर्णमालेच्या स्वीकाराबाबत जी सर्वांगीण दक्षता घेतली जात आहे, तशी दक्षता पूर्वीं कधींच-उदाहरणार्थ साक्षरताप्रसाराचें साधन म्हणून 'बेसिक इंग्लिश'चा प्रचार-करण्याचे जे विविध प्रयोग झाले तेव्हांहि-नीटपणें घेण्यांत आलेली नव्हती. चिनी अक्षरवाटिकांचें ध्वनिदर्शक लिपींत स्पष्टीकरण करणारीं पुस्तकें आत्मविश्वासानें अगोदरच गृहीत धरण्यांत आलीं होतीं आणि कांहीं वस्त्यांमधून अशा प्रकारें छापलेलीं वृत्तपत्रें आधींच चालू झालेलीं आहेत, असाहि दावा केला जातो. खेरीज ध्वनिदर्शक वर्णमालेचें शिक्षण हें प्राथमिक शाळांच्या अभ्यासक्रमांतहि अंतर्भूत केलें जात आहे :

" किंडरगार्टन शाळेच्या वरच्या वर्गांतील मुलांना जर का ध्वनिदर्शक वर्णमाला शिकवली गेली आणि तद्द्वारा चिनी अक्षरवाटिका ओळखूं येऊं लागली तर .... प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रम खचितच अल्प मुदतीचा करतां येईल.... प्राथमिक शिक्षणांतहि फार मोठी क्रांति होईल. "

१९६० सालच्या जूनमध्यें पेकिंग येथें सांस्कृतिक आणि शैक्षणिक क्षेत्रांतील वरिष्ठ कार्यकर्त्यांची एक राष्ट्रीय परिषद भरणार होती. या संधीचा फायदा घेऊन ध्वनिदर्शक वर्णमालेचा उपयोग कसा करावा, याची कल्पना देणारें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. चिनी अक्षरवाटिकेचें उच्चाटण करण्यावर त्यांत भर देण्यांत आलेला नव्हता. परंतु किंडरगार्टनच्या शेवटच्या वर्षांतलीं सहा वर्षांचीं मुलें तसेंच प्राथमिक शाळेच्या पहिल्या वर्गांतलीं मुलें ही वर्णमाला झटकन आत्मसात करतात, असा दावा मांडला गेला होता. प्रादेशिक बोलीबरोबरच्या अधिकृत चिनी भाषेचा – 'मँडेरिन 'चा अभ्यास सुकर रीतीनें होतो, असेंहि मांडण्यांत आलें होतें.

शैक्षणिक घडामोडींचा प्रचार करतांना चिनी सरकारनें पुरविलेली आंकडेवारी नेहमींच कशी फुगवून सांगितलेली असते, याचा पडताळा यापूर्वी आलेलाच आहे. ध्वनिदर्शक वर्णमालेचा स्वीकार करणाऱ्या फावल्या वेळच्या शाळांमधून विद्यार्थ्याला साक्षर करण्यास पूर्वीप्रमाणें दोनदोन तीनतीन वर्षें आतां लागत नाहींत. आतां पांचसहा महिन्यांत काम भागतें. शांसि प्रांतांतील जवळजवळ चाळीस टक्के लोक, तसेंच शांटुंगमधील ४·५५ दशलक्ष माणसें ध्वनिविचाराचें शिक्षण घेत आहेत. ह्या अभिनव प्रयोगाकडे परकीय लोकहि लक्षपूर्वक आणि बहुधा सहानुभूतिपूर्वक पाहात असतील. आतां दिलेल्या किंवा तत्सम आंकडेवारीचा हेतु एवढाच कीं तिच्यावरून या प्रयोगाला चीनमध्यें केवढें महत्त्व प्राप्त झालें आहे, हें ध्यानांत यावें.

□ □ □

# भाग तिसरा

□□

## पुढील वाटचाल

□□

### १९. अभिप्राय

चीन हा एकाच वेळीं सर्वांत मोहक आणि सर्वांत रुक्ष असा देश आहे आणि चिनी शैक्षणिक संघटनेच्या अभ्यासांत हे उभय गुणविशेष प्रतिबिंबित होणें, अटळच आहे. कोणत्याहि राष्ट्राच्या आत्म्याचा प्राथमिक आविष्कार शिक्षणाच्या रूपानें होत असतो. चीनच्या सामुदायिक कल्पनाविश्वाचा आणि त्याचबरोबर भाऊगर्दीच्या कंटाळवाण्या ठोकळेबाजपणाचा उलगडा करून घ्यावयाचा असेल, तर त्याला चीनच्या शैक्षणिक घडामोडींच्या परिशीलना-सारखी दुसरी गुरुकिल्ली नाहीं.

मानवाच्या तांत्रिक प्राविण्याची आणि एकंदर ज्ञानाची जसजशी वाढ होत जाईल, तसतसा मानवाकडून सांघिक जीवनाचा आणि समुदायवादाचा स्वीकार अधिकाधिक होत जाईल, अशी जर का वाचकांची श्रद्धा असेल, तर त्यांच्या दृष्टीनें चीन हा आपल्या समाजरचनेनें आणि शिक्षणपद्धतीनें जगाला आधींच मार्गदर्शक ठरलेला आहे, असें म्हटलें पाहिजे. परंतु व्यक्तीला अणु-समान क्षुद्र मानण्याच्या वृत्तीविरुद्ध जर कधीं प्रतिक्रिया होणार असेल आणि अतिभयानक विभूतिपूजेचा ठसा उमटविणाऱ्या नेतृत्वाची पकड जर कधीं ना कधीं झुगारून दिली जाणार असेल, तर मात्र चिनी शिक्षणपद्धतीचा गाडा आज ज्या मार्गानें जात आहे, त्यांत क्रांतिकारक बदल करून त्याला बरोबर विरुद्ध दिशेनें वाटचाल करावी लागेल. पण परकीय निरीक्षकालाच नव्हे, तर प्रत्यक्ष चिनी नागरिकालासुद्धां सरकारी उपक्रमांच्या हेतूविषयीं वृत्तपत्रांत येतें, त्याहून अधिक माहिती मिळण्यासारखी नसते. सामुदायिक जीवनाचा

जो मोठा प्रयोग चीनमध्यें सांप्रत चालू आहे, त्याच्या भवितव्याविषयीं भाकित करण्याच्या फंदांत न पडतां एखादा शिक्षणतज्ज्ञ, चीनला आपल्या शिक्षण-विषयक प्रयत्नांत कोणते छोटे बदल घडवून आणावे लागतील, त्याची दिशा आत्मविश्वासपूर्वक दाखवूं शकेल. उदाहरणार्थ, निढळाच्या घामानें येणाऱ्या शैक्षणिक कार्यक्षमतेवर आणि सामुदायिक प्रयत्नांवर चीनची जी निष्ठा आहे, तिला मुरड घालण्याची वेळ आली आहे, हें स्पष्टच दिसत आहे. घाम गाळणारा कामकरी हा रोज खातो त्याहून अधिक उत्पादन करतो, हें अर्थशास्त्रीय गृहीतकृत्य महाअनर्थकारक आहे. आधुनिक जगांत तांत्रिक क्षेत्रांतील पुढाकार हा राष्ट्राच्या सर्वश्रेष्ठ बुद्धिमंतांना पूर्ण वेळ पुरण्याजोगा उद्योग आहे, हें नाकबूल करणें म्हणजे शैक्षणिक महामूर्खपणा आहे. आणि चीननें व्यक्तिगत व्यावसायिक कर्तबगारीला वाव ठेवून उद्योगधंद्यांना उत्तेजन दिलें, तरच तें इतर प्रगत राष्ट्रांशीं बरोबरी करण्याची आशा बाळगूं शकेल.

वैज्ञानिक आणि तांत्रिक प्रगतीची विशिष्ट पातळी कांहीं पोकळींतून निर्माण होत नाहीं. प्रत्येक पातळीवरील शैक्षणिक गुणवत्ता चांगलीच वाढल्यावांचून ती साध्य होणें, शक्य नाहीं. वास्तव परिस्थितीची जाणीव चिनी नेत्यांनाहि आहे. शिक्षणमंत्र्यांनीं अगदीं स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, आपल्या शैक्षणिक क्षेत्रांत प्रत्येक पातळीवर शिक्षणाची गुणवत्ता वाढणें अत्यावश्यक आहे. त्यांनीं असेंहि सुचविलें आहे कीं, सध्यां विद्यापीठीय, माध्यमिक आणि प्राथमिक पातळीवर जो अभ्यासक्रम शिकविला जात असतो त्यांतल्या कांहीं भागाची 'उचलबांगडी' केली पाहिजे. कनिष्ठ माध्यमिक अंकगणित आणि बीजगणिताचा कांहीं भाग यांचा अंतर्भाव प्राथमिक शाळांच्या अभ्यासक्रमांत होणें इष्ट आहे. इतिहास, भूगोल व सृष्टिज्ञान हे विषय प्राथमिक पातळीवर तरी तीन वेगळे विषय म्हणून असूं नयेत, त्यांचा 'सामान्यज्ञान' या नवीन विषयांत अंतर्भाव करण्यांत यावा. माध्यमिक पातळीवर इतिहास आणि भूगोल हा एक जोडविषय मानावा. अभ्यासक्रमांतील पुनरावृत्ति टाळण्यांत यावी. वरिष्ठ माध्यमिक शाळांच्या अभ्यासक्रमांतून ॲनॅलिटिकल जॉमेट्री आणि डिफरन्शियल आणि इंटिग्रल कॅलक्युलस यांचा समावेश व्हावा आणि अणुविषयक सिद्धान्ताची संपूर्ण माहिती अभ्यासक्रमांत अंतर्भूत व्हावी.

मंत्रिमहाशयांचा मुख्य आक्षेप हा होता कीं, सध्यां चालू असलेले शाळांचे अभ्यासक्रम कालमान पाहतां जुने झालेले आहेत; ते २० व्या शतकापेक्षां

१८ व्या आणि १९ व्या शतकाचेच निदर्शक आहेत. मंत्र्यांनीं खाजगी अभ्यास आणि खाजगी शिक्षण या गोष्टी वाढल्या पाहिजेत, असेंहि सुचविलें. पण सांघिक कार्यपद्धतीशीं आणि विशेषतः शिक्षकांच्या कमतरतेशीं त्याचा मेळ नीटपणें कसा घालायचा, याचा मात्र खुलासा त्यांनीं केला नाहीं. १९६० सालच्या मध्यकालांत मंत्र्यांनीं दिलेल्या या इशाऱ्याकडे दुर्लक्ष झालेलें नसेलच. परंतु अभ्यासक्रमांत सुधारणा घडवून आणण्यासाठीं ज्या ज्या मोहिमा आंखल्या गेल्या, त्यांची अधोगतिवजा परिणति एकाच शिफारशींत झाली : अध्यक्ष माओ यांच्या ग्रंथाचा अधिकाधिक सखोल अभ्यास करण्यांत यावा! कम्युनिस्टांची पक्षीय मतप्रणाली आणि तंत्रविद्या यांना अभ्यासक्रमांत द्यावयाच्या वेळाविषयीं गंभीरपणें फेरविचार करून मेळ घालण्याची वेळ आतां फार दूर राहिलेली नाहीं. चालू सामुदायिक प्रवृत्ति आणि कम्यून्सचा होणारा विकास यांमधून शिक्षणाचा भार उचलण्याच्या दृष्टीनें फार मोठा कार्यभाग साधला जाईल, असें भविष्य केल्यास तें तर्कशुद्ध ठरेल. कम्युनिस्टप्रणीत समाजरचनेच्या विकासाबरोबर दुबार अधिवेशनें असणाऱ्या शाळा, विशेषतः दुबार अधिवेशनांच्या प्राथमिक शाळा एकाधिवेशनी होतील आणि रशियांतील शैक्षणिक घडामोडींशीं स्पर्धा करण्याच्या इच्छेनें बहुधा त्यांचें रूपांतर 'बोर्डिंग' शाळांमध्यें होईल. या सर्व समस्या सोडविण्यासाठीं करावी लागणारी आर्थिक आणि इतर तरतूद राज्यशासनाऐवजीं लोकांचीं कम्यून्सच करतील, असा आज तरी रंग दिसत आहे.

शिक्षणक्षेत्रांतील या घडामोडींनीं कांहीं प्रमुख समस्या आपोआपच सुटण्याचा संभव आहे. 'बोर्डिंग' पद्धतीच्या शाळांमुळें कम्युनिस्टांची सांप्रदायिक नीति मुलांच्या दैनंदिन जीवनांत आणि अनुभवांत प्रत्यक्षच उतरण्याची शक्यता निर्माण होईल आणि मग सांप्रदायिक पक्षनीतीचे वेगळे पुस्तकी वर्ग चालविण्याची आवश्यकता कमी कमी होत जाईल आणि दुसरीकडे खऱ्या शैक्षणिक विषयांसाठीं आणि विशेषतः विज्ञानाच्या अभ्यासासाठीं अधिकाधिक वेळ मिळत जाईल.

□□□

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्र
क्रमांक ७४६२७ वि: निबंध
क्रमांक २०६८ नों दि: २०।३।०७

## इंग्रजींतील हें ज्ञानभांडार आतां
## मराठी-भाषी वाचकांसाठींहि खुलें झालें आहे

✦ **सम्पन्न समाज**

लेखक : **जॉन गॅलब्रेथ**; अनुवादक : प्रा. **गंगाधर गाडगीळ**
जगांतला आज सर्वांत सम्पन्न समजला जाणारा जो अमेरिकन समाज त्याच्या विचारप्रवाहावर ही शोधज्योत आहे : रु. ५–००

✦ **अमेरिकन साहित्याचा इतिहास**

लेखक : **मार्कस् कन्लीफ**; अनुवादक : **मंगेश पाडगांवकर**
अमेरिकन लेखकांनीं लिहिलेल्या साहित्याची ओळख : रु. ६–००

✦ **अमेरिकन संयुक्त संस्थानें : भूगोल व विकास**

सामान्य माणसालाहि समजेल अशा सोप्या भाषेंत शब्दांच्या व चित्रांच्या साहाय्यानें संयुक्त संस्थानांचें (अमेरिकेचें) स्वरूप रेखाटण्याचा हा आगळा प्रयत्न : रु. ४–००

✦ **आर्थिक विकासाच्या पायऱ्या**

लेखक : **डब्ल्यू. डब्ल्यू. रोस्टोव्ह**; अनुवादक : **स. ह. देशपांडे**
'The Stages of Economic Growth : A Non-Communist Manifesto' या ग्रंथाचा हा अनुवाद म्हणजे आर्थिक इतिहासाची मीमांसा : २–५०

✦ **लाट उलटवायची आहे**

'To Turn the Tide' : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष **जॉन् एफ्. केनेडी** यांच्या कांहीं महत्त्वाच्या मार्गदर्शक भाषणांचा संग्रह
अनुवादक : **पां. वा. गाडगीळ** रु. ३–००

✦ **अमेरिकेंतील श्रमिक आंदोलन**

'Labour in America' : अमेरिकेंतील कामगारांच्या चळवळीचा सांगोपांग इतिहास; लेखक : **फॉस्टर ऱ्हीं डलेस**
अनुवादक : सौ. **प्रभा तुळपुळे** रु. ६–००

## ✦ आ वा ह न

'A Time for Action' : अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ्. केनेडी यांच्या हत्येनंतर उत्पन्न झालेल्या आणीबाणीच्या काळासंबंधीं विद्यमान राष्ट्राध्यक्ष **श्री. लिंडन जॉन्सन** यांचीं व्याख्यानें : अनुवादक : **गोविंद तळवलकर** रु. २–००

## ✦ लिं ड न  जॉ न्स न

लेखक : **बूथ मूनी**; अनुवादक : **अम्बादास अग्निहोत्री**
अमेरिकेच्या विद्यमान राष्ट्राध्यक्षांचें चरित्र-चित्र : रु. २–५०

## ✦ विसाव्या शतकांतील अमेरिकेमधला धर्म

लेखक : **हर्बर्ट डब्ल्यू. स्नायडर**; अनुवादक : **चं. वि. बावडेकर**
एक अभ्यास : रु. ५–००

## ✦ धैर्यशीलांचीं शब्दचित्रें

लेखक : **जॉन एफ्. केनेडी**; अनुवादक : **पां. वा. गाडगीळ**
अमेरिकेंतील लोकशाहीची आघाडी सांभाळणाऱ्या शूर लोक-प्रतिनिधींचीं बोलकीं शब्दचित्रें–पुलिट्झर पारितोषिक प्राप्त ग्रंथ ( दुसरी आवृत्ति ) : रु. २–५०

## ✦ उदारमतवाद्याचें अंतरंग

संपादक : **हेन्री स्टील कॉमेजर**; अनुवादक : **अम्बादास अग्निहोत्री**
सुप्रसिद्ध अमेरिकन मुत्सद्दी श्री. चेस्टर बोल्स यांच्या विविध विषयांवरील महत्त्वाच्या भाषणांचा संग्रह : रु. ४–००

**वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रा. लि.; मुंबई २**

# अमेरिकेंतील शिक्षण

✦ ✦ ✦

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९४३८४

संकलक : अमेरिकेचें शिक्षणखातें

अनुवाद : श्री. मो. स. श्रीखंडे

मूल्य : रु. ४–००

✦ ✦ ✦

एका फार महत्त्वाच्या विषयावर हा एक उपयुक्त ग्रंथ मराठींत प्रकाशित झाला आहे.

आज जगाला दिसत असलेल्या समृद्ध अमेरिकेचा पाया तेथील शिक्षण-पद्धतीनें घातला, असें म्हणणें अतिशयोक्तीचें होणार नाहीं. परंतु ही शिक्षणपद्धति कशी नि काय आहे, तिची अंमलबजावणी कोणत्या प्रकारें केली जाते याचा अभ्यास सद्यःकालीन भारतीय परिस्थितीला मोठा उपकारक होईल.

अमेरिकेच्या पन्नासहि घटक-राज्यांना शिक्षणाच्या बाबतींतलें धोरण व मार्ग ठरविण्याचें स्वातंत्र्य आहे. त्यांना केंद्र केवळ आर्थिक मदत आणि मार्गदर्शन करतें. आणि केंद्राचा शिक्षणावरील खर्च सुमारें दोन महापद्म डॉलर्स होतो. याशिवाय अमेरिकन शिक्षणपद्धतींत व्यक्तिविकास हें वैशिष्टय आहे. तेथील नागरिक शिक्षणाच्या बाबतींत आपण होऊन लक्ष घालतात, हेंहि ध्यानांत ठेवण्यासारखें आहे.

आज आपल्या देशांत ज्या शिक्षणविषयक समस्या दिसतात त्या सोडविण्याच्या दृष्टीनें हा ग्रंथ अवश्य अभ्यसनीय ठरेल.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
७५६३२ दि. ...
२०८८ ... २०१३/०९

REFBK-0014384
REFBK-0014384

# चीनमधील शिक्षण

• •

के. ई. प्रीस्टले

• •

चिनी शिक्षणपद्धतीची गोष्ट अशी आहे कीं, पाश्चात्य वाचकाला तिची पुरेशी कल्पना आणून देण्याइतपत तिचें चित्र रेखाटायचें म्हटलें, तरी कांहीं खास अडचणी दत्त म्हणून पुढें उभ्या राहतात. दुसरें असें कीं, चिनी शिक्षण-पद्धतीनें रूढ चाकोरी इतकी झुगारुन दिली आहे कीं, तेंच तिचें खास वैशिष्टय ठरावें.

अमेरिकन संघटनेच्या धर्तीवरची मूळ परंपरा, त्यांत सोव्हिएट रशियाकडून मिळालेली स्फूर्ति, तसेंच राजकीय व सामाजिक क्षेत्रांत घडून आलेली क्रांति व या सर्वांना भडकवून देणारें अलिकडचें आर्थिक वारें या एकंदर गोष्टींचा मिलाफ होऊन एक प्रकारची विचित्र शैक्षणिक यंत्रणा चीनमध्यें उभारली गेली आहे.

चिनी शिक्षणपद्धतीचीं अंगोपांगें कांहीं वेगळीं वाटत असतील तर त्यांचें कारण असें कीं, चीनच्या विशिष्ट इतिहासाचें त्यांत स्पष्ट प्रतिबिंब पडलेलें आहे. चिनी शिक्षणपद्धति हें चीननें केलेल्या झगड्याचें प्रतीक आहे. चीनची अर्थव्यवस्था आणि चीनचा इतिहास यांतच ही शिक्षणपद्धति समजावून घेण्याची गुरुकिल्ली आहे.